# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२७५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२८ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## बांगलादेशमधील हिंदू बांधवांना मोठा दिलासा ‘इस्कॉन’वरील बंदीस उच्च न्यायालयाचा नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ढाका**

बांगलादेशमध्ये 'इस्कॉन' वर बंदी घालण्याबाबत स्वतःहून आदेश देण्यास ढाका उच्च न्यायालयाने नकार दिला आहे, असे वृत्त बांगलादेशमधील 'द डेली स्टार'ने दिले आहे. वकील मोनीर उद्दीन यांनी बुधवारी (दि.२७) 'इस्कॉन'वर बंदी घालावी, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली होती.

इस्कॉन ही एक जातीय अशांतता भडकणारी संघटना असल्याचा दावा वकील मोनीर उद्दीन यांनी केला होता. ही संघटना पारंपारिक हिंदू समुदायांवर आपल्या श्रद्धा लादत असल्याचा आरोपही केला होता. तसेच बांगलादेशला अस्थिर करण्याचा आणि भारतीय माध्यमांशी सहयोग करण्याचा आरोपही केला होता.

मोनीर यांच्या याचिकेवर बांगलादेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती फराह महबूब आणि न्यायमूर्ती देबाशीष रॉय चौधरी यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. बांगलादेशमधील कायदा आणि सुव्यवस्थेबरोबरच जनतेच्या मालमत्तेचे रक्षण करण्याबाबत सरकारने सावध राहिले पाहिजे,




असे खंडपीठाने सरकारला सुनावले.

**चिन्मय कृष्णांच्या अटेकच्या निषेधार्थ झाली होती निदर्शने**


बांगलादेशात राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याप्रकरणी ३० ऑक्टोबर रोजी चिन्मय कृष्ण दास प्रभू यांच्यासह १९ जणांवर देशद्रोह कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी दोघांना अटकही करण्यात आली आहे. २५ ऑक्टोबर रोजी सनातन जागरण मंचने चितगाव येथील लालदिघी मैदानावर आठ कलमी मागण्या घेऊन रॅली काढल्याचा आरोप आहे. यावेळी चौकात असलेल्या आझादी स्तंभावर काही लोकांनी भगवा ध्वज फडकावला होता. या ध्वजावर आमी सनातनी असे लिहिले होते. याबाबत चिन्मय कृष्ण दास यांच्यावर राष्ट्रध्वजाचा अवमान आणि अपमान केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**चिन्मय कृष्ण दास प्रभू यांच्यासह १९ जणांवर देशद्रोहाचा गुन्हा**

बांगलादेशात राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याप्रकरणी ३० ऑक्टोबर रोजी चिन्मय कृष्ण दास प्रभू यांच्यासह १९ जणांवर देशद्रोह कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी दोघांना अटकही करण्यात आली आहे. २५ ऑक्टोबर रोजी सनातन जागरण मंचने चितगाव येथील लालदिघी मैदानावर आठ कलमी मागण्या घेऊन रॅली काढल्याचा आरोप आहे. यावेळी चौकात असलेल्या आझादी स्तंभावर काही लोकांनी भगवा ध्वज फडकावला होता. या ध्वजावर आमी सनातनी असे लिहिले होते. याबाबत चिन्मय कृष्ण दास यांच्यावर राष्ट्रध्वजाचा अवमान आणि अपमान केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## प्रियंका गांधींनी घेतली खासदारकीची शपथ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नवी दिल्ली**



काँग्रेस नेत्या आणि पोटनिवणुकीत वायनाड येथून विजयी झालेल्या उमेदवार प्रियंका गांधी यांनी आज खासदारकीची शपथ घेतली, पद व गोपनियतेची शपथ घेतली.संसदेत शपथ घेतेवेळी प्रियंका गांधींनी पांढऱ्यां रंगाची सोनेरी किनार असलेली साडी परिधान केली होती.

प्रियंका यांच्यासमवेत त्यांचे भाऊ आणि संसदेतील लोकसभा विरोधीपक्षनेते राहुल गांधी हेही उपस्थित होते, आपल्या बहिणीसोबत ते संसदेतील आवारात जाताना दिसून आलेप्रियंका गांधींनी हाती लाल रंगातील संविधान घेऊन पद व गोपनियतेची शपथ घेतली

काँग्रेस पक्ष, राहुल गांधी आणि संविधानाचे जे मूल्य आहे, त्याला मजुबती देण्याचं काम होईल, अशी पहिली प्रतिक्रिया प्रियंका गांधी यांनी शपथ घेतल्यानंतर दिली आहे.

राहुल गांधी यांनी प्रियंका गांधी व आई सोनिया गांधी यांच्यासमवेतचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. आता देशाच्या संसदेत आईसह त्यांची दोन्ही मुले सत्ताधाऱ्यांविरुद्ध एकत्र येतील दरम्यान, शिवसेना युबीटी खासदार संजय राऊत यांनी ट्विट करुन शेरणी संसद मे आ गयी... असे म्हणत प्रियंका गांधींचं स्वागत केलं आहे.

## मी मोदी सरकारसोबत उभी ठाकणार ममता बॅनर्जींचे भर विधानसभेत मोठे वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नवी दिल्ली**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भर विधानसभेत मोठी घोषणा करून टाकली आहे. मी मोदी सरकारसोबत उभी असल्याचे ममता बॅनर्जी म्हणाल्या आहेत. बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचारांवर ममता यांचे हे वक्तव्य आले आहे.

जेव्हा दुसऱ्या देशांची गोष्ट येईल तेव्हा आम्ही केंद्र सरकारसोबत उभे ठाकणार अशी माझ्या पक्षाची निती आहे. जर कोणत्याही धर्माच्या लोकांवर अत्याचार होतो तर आम्ही त्याचा कठोर शब्दांत निषेध व्यक्त करतो. जर बांगलादेशात कोणत्याही धर्मावर अत्याचार होत असले तर आम्ही त्याचे समर्थन करू शकत नाही, असे ममता म्हणाल्या आहेत.

बांगलादेशातील इस्कॉनशी संबंधीत चिन्मय कृष्ण दास ब्रम्हचारी यांच्या अटकेनंतर ममता यांनी भारतातील इस्कॉन प्रमुखांशी चर्चा केली. ही दुसऱ्या देशातील घटना असल्याने यावर केंद्र सरकारने योग्य कारवाई करायला हवी, आम्ही यासाठी केंद्र सरकारसोबत आहोत, असे ममता यांनी स्पष्ट केले. 'संमित सनातनी जोत' या हिंदू गटाचे नेते चिन्मय कृष्ण दास ब्रह्मचारी यांना बांगलादेश पोलिसांनी सोमवारी ढाक्याच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक केली होती. यानंतर



बांगलादेशात हिंसा भडकली होती. दास यांना तुरुंगात पाठवल्यानंतर उसळलेल्या हिंसाचारात चितगावमधील सैफुल इस्लाम या वकीलाला आपला जीव गमवावा लागला. यासाठी अनेकांनी इस्कॉनकडे बोट दाखवले आहे. हिंसाचारानंतरच इस्कॉनवर बंदीचा अर्जही कोर्टात देण्यात आला होता. बांगलादेश सरकारनेही कोर्टात इस्कॉनला 'कट्टरवादी संघटना' म्हटले आहे.

## मंत्रिमंडळासाठी भाजपचा नवीन नियम, अनेक ज्येष्ठांना बसणार फटका, कोण कोणाची संधी जाणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमत मिळवले. आता मुख्यमंत्रीपदाचे नाव दोन दिवसांत जाहीर होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री भाजपचा असणार असल्याचे संकेत मिळत आहे. तसेच मंत्रिमंडळाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याची चर्चा आहे. त्यात भाजपचे २० मंत्री असणार आहेत. नवीन मंत्रिमंडळात भारतीय जनता पक्ष युवा आमदारांना संधी देणार आहे. त्यामुळे ज्येष्ठ आमदार आणि शिंदे सरकारमधील काही जणांना



डच्चू मिळणार असल्याचे संकेत मिळत आहे. भाजपची भविष्यातील रणनीती म्हणून ५० वर्षांपेक्षा कमी वय असणाऱ्यांना मंत्रिमंडळात संधी दिली जाणार आहे.

**भाजपचा असा नियम**

भाजपकडून ‘पार्टी विद डिफरेंस’ असा दावा नेहमी केला जातो. त्यामुळे भाजपने खासदारकीसाठी कठोर निर्णय घेतले. काही जणांना खासदारकी गमवावी लागली. लालकृष्ण अडवाणी, मुरलीमनोहर जोशी यांच्या सारख्या पक्षाची उभारणी करणाऱ्या ज्येष्ठ सदस्यांना राजकीय निवृत्ती घ्यावी लागली. संसदेत ७५ वयाचा निकष भाजपने ठेवला होता. आता राज्य पातळीवर नवीन नेतृत्व तयार करण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. यामुळे महाराष्ट्रातील नवीन मंत्रिमंडळात भाजप जास्तीत जास्त युवा आमदारांना संधी देणार आहे. त्यात ५० वर्षांपेक्षा कमी वय हा निकष लावण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक जेष्ठ सदस्यांना मार्गदर्शकांची भूमिकेत जावे लागणार आहे.

**महाराष्ट्रातील या संभाव्य नावांना बसू शकतो फटका**

महाराष्ट्रातील शिंदे सरकारमधील मंत्री असणारे किंवा काही ज्येष्ठ भाजप नेते मंत्रिमंडळात समावेश होण्याच्या प्रतिक्षेत आहेत. परंतु भाजपने लावलेल्या निकषाचे पालन केल्यास ५० पेक्षा जास्त वय असणाऱ्यांना फटका बसू शकतो. त्यात चंद्रकांत पाटील (वय ६५), गिरीश महाजन (वय ६४), चंद्रशेखर बावनकुळे (वय ५५), मंगलप्रभात लोढा (वय ६८) राधाकृष्ण विखे पाटील (वय ६५), सुधीर मुनगंटीवार (वय ६२), रवींद्र चव्हाण (वय ५४), अतुल भातखळकर ( वय ५९) मंदा म्हात्रे (वय ६८), मनीषा कायंदे (वय ६१) यांचा समावेश आहे.

## खूप अभिमान वाटतो बाबा ! खासदार श्रीकांत शिंदे यांची वडिलांसाठी भावूक पोस्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल येताच महायुतील बहुमताचा कौल मिळाला. तेव्हापासूनच राज्यात मुख्यमंत्री कोण याचा सस्पेन्स वाढला आहे. त्यावरून राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांचे नाव पुन्हा समोर येत असून काल काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत त्यांची भूमिका स्पष्ट केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अखेर मुख्यमंत्रीपदावरचा दावा सोडण्याचे संकेत दिले. लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ ही ओळख आपल्यासाठी महत्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केलं. त्यांच्या या निर्णयानंतर मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा मार्ग मोकळा झाल्याचे दिसत असून आज भाजपचे वरिष्ठ नेते काय भूमिका घेतात त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

याचदरम्यान एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी आपल्या



वडिलांसाठी एक खास, भावनिक पोस्ट लिहीली आहे. गोर – गरिबांचा आशीर्वाद आणि सदिच्छा हीच शिंदे साहेबांची खरी संपत्ती आहे. खूप अभिमान वाटतो बाबा! अशा शब्दांत श्रीकांत शिंदे यांनी एकनाथ शिंदे यांचे कौतुक करत ही पोस्ट लिहीली असून त्याची सध्या सर्वत्र चर्चा आहे.

मला माझे बाबा आणि आमचे शिवसेना मुख्यनेते मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब यांचा खूप अभिमान वाटतो. त्यांची महाराष्ट्र आणि येथील जनतेशी असलेली अतूट बांधिलकी अतुलनीय आहे. त्यांनी अहोरात्र अथक परिश्रम केले. समाजातील प्रत्येक घटकाची निस्वार्थ सेवा करून त्यांचे प्रेम, विश्वास आणि प्रशंसा मिळवली. ते स्वतःला ‘सीएम’ म्हणजे ‘कॉमन मॅन’ समजत. त्यांनी सर्वसामान्यांसाठी वर्षा बंगल्याचे दार उघडले आणि जनसेवेत एक नवा इतिहास घडवला.

कारकिर्दीच्या शिखरावर असतानाही त्यांची नम्रता आणि कर्तव्यभावना दिसून येते. आज त्यांनी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी आणि माननीय श्री. अमित शहाजी यांच्यावर विश्वास ठेवून, वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा युती धर्माचे पालन करत एक प्रगल्भ उदाहरण ठेवले आहे असे श्रीकांत शिंदे यांनी नमूद केलं.

**सत्तेचा मोह भल्याभल्यांना असतो पण**

सत्ता आणि पद अनेकदा सार्वजनिक जीवनावर वर्चस्व गाजवते. भल्याभल्यांना मोहात पाडते, पण शिंदे साहेब अपवाद ठरले. त्यांच्यासाठी जनसेवा आणि राष्ट्रनिर्मिती हे नेहमीच सर्वोच्च प्राधान्य राहिले आहे आणि त्यांचा वारसा पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहील. गोर – गरिबांचा आशीर्वाद आणि सदिच्छा हीच शिंदे साहेबांची खरी संपत्ती आहे अशा शब्दांत श्रीकांत शिंदे यांनी एकनाथ शिंदे यांच्यासाठी पोस्ट लिहीली. खूप अभिमान वाटतो बाबा! असेही त्यांनी लिहीलं आहे.

## ‘एक दिवस असा येईल, उद्धव ठाकरे देश सोडून जातील’ - रामदास कदम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ शिर्डी**

राज्यातील शिवसेनेत बंडखोरी झाल्यानंतर शिवसेनेत दोन गट तयार झाले. शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम शिवसेना उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करण्याची संधी सोडत नाही. आता त्यांनी उद्धव ठाकरे यांचे भविष्य सांगितले आहे. रामदास कदम म्हणाले, ‘एक दिवस असा येईल की उद्धव ठाकरे रात्री दोन वाजता आपल्या कुटुंबाला घेऊन देश सोडून जातील’, असे माझे शब्द आहेत. तुमच्याकडे लिहून ठेवा. बाळासाहेब यांच्याशी त्यांनी जी बेईमानी केली. शिवसेना प्रमुखांच्या पाठीत खंजीर खुपसला. त्यांनी जे पाप केले. त्या पापाचे प्राश्चित्य उद्धव ठाकरेंना भोगावच लागेल, असा जोरदार हल्ला रामदास कदम यांनी केला.



शिंदे गटाचे नेते रामदास कदम सहकुटुंब साईदरबारी आले. त्यावेळी माध्यमांशी ते बोलत होते. यावेळी रामदास कदम म्हणाले, साईबाबांनी महायुतीला मोठा कौल दिला आहे. दोन दिवसांत महायुतीचे सरकार बनेल. महाराष्ट्रातील जनतेने १८ ते २० तास महाराष्ट्रात काम करणारा मुख्यमंत्री पाहिला. ते व्यक्तीमत्व म्हणजेच एकनाथ शिंदे आहे. मागच्या वेळी आमचा आकडा कमी असताना आम्हाला भाजपच्या वरिष्ठांनी संधी दिली. आता भाजपचे १३३ हून अधिक आमदार स्वतःचे आहे. त्यामुळे आम्ही किती मागावे? काय मागावे? याचे भान ठेवलं पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

आम्हा सर्वांचीच इच्छा की एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत. परंतु भाजपला देखील त्यांचा पक्ष चालवायचा आहे. त्यामुळे भाजपचे वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल. महायुतीमध्ये कुठलाही मतभेद नाहीत, असे कदम यांनी सांगितले.

## बच्चू कडू यांना महायुतीत घेऊ नका, त्यांनी विश्वासघात; भाजपच्या वरिष्ठ नेत्याचं ठाम मत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अनेक दिग्गजांचा पराभव झाला. त्यापैकीच एक म्हणजे प्रहारचे नेते बच्चू कडू अचलपूर विधानसभा मतदारसंघातून बच्चू कडू यांचा पराभव झाला. विधानसभा निवडणुकीच्या पराभवानंतर बच्चू कडू घेणार राज्यभरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा आणि कार्यकर्त्यांचा बुलढाण्याच्या शेगावमध्ये मेळावा घेणार आहेत. सत्ता की सत्तेच्या बाहेर, झेंडा की सेवा याचा निर्णय बच्चू कडू घेणार आहेत. त्याआधीच बच्चू कडू यांच्या नावाला विरोध केला जात आहे. भाजपच्या वरिष्ठ नेत्याने बच्चू कडू यांना महायुतीत घेऊ नये, अशी भूमिका मांडली आहे.

**बच्चू कडूंना महायुतीत घेऊ नका**



राज्याचे माजी महसूलमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी बच्चू कडू यांच्या नावाला विरोध केला आहे. बच्चू कडू यांना महायुती सरकारने पाठबळ दिलं. धोरण मान्य केली. दिव्यांगाची धोरण मान्य केली. त्याच्याशी प्रतारणा करून बच्चू कडू यांनी जो विश्वासघात दाखवला. त्यामुळे त्यांना महायुतीमध्ये सामिल करून घेण्याची आवश्यकता नाही. त्यांना घेऊ नये अशी आमची अपेक्षा आहे, विखे पाटील म्हणालेत. मुंबईत पक्षश्रेष्ठींच्या भेटीनंतर राधाकृष्ण विखे पाटील मतदारसंघात सक्रीय झाले आहेत. ग्रामदैवत म्हसोबा महाराजांच्या यात्रेच्या नियोजनासाठी ग्रामस्थांसोबत बैठक घेतली. तेव्हा ते माध्यमांशी बोलत होते.

## संपादकीय ......

# खुर्ची सोडली, आता पुढे काय?

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश म्हणजे भारत, अशी आपली ओळख आहे. लोकांचे लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही, अशी ढोबळमानाने लोकशाहीची व्याख्या केली जाते, पण वास्तवात तसे चित्र आहे का? लोकशाही मूल्ये बेदरकारपणे पायदळी तुडवली जात आहेत, हेच कटू पण वास्तव आहे. महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून जे सुरू आहे ते पाहता लोकहिताला पूर्णपणे हरताळ फासला गेल्याचे स्पष्ट होते. कोणतीही नीतिमत्ता नाही. कोणतीही विचारसरणी नाही.

फक्त सत्ता, त्यातून मिळणारा पैसा आणि त्या पैशांच्या ताकदीवर पुन्हा सत्ता मिळवायची हेच चक्र सुरू आहे. राज्यात २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत भाजप आणि शिवसेना युतीचा विजय झाला. मुख्यमंत्रिपदावरून दोन्ही पक्षांमध्ये बिनसले. शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेत वेगळी चूल मांडली. महाविकास आघाडी तयार करून सरकार स्थापन केले, पण अवघ्या अडीच वर्षांत भाजपने महाविकास आघाडीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फोडून वेगळे केले आणि त्यांच्या मदतीने सरकार स्थापन केले.

अशा रीतीने प्रत्येकाला सत्तेत वाटा मिळाला, पण या सर्व घडामोडीत सर्वसामान्य कुठे आहेत? त्यांच्या हाती काय लागले? त्यांचे प्रश्न सुटलेत का? याचे उत्तर दुर्दैवाने नाही हेच आहे. आता राज्यात नव्याने निवडणूक झाली. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती विरुद्ध शिवसेना उबाठा, काँग्रेस आणि एनसीपी एसपी यांची महाविकास आघाडी अशी लढत झाली. लोकसभा निवडणुकीची पुनरावृत्ती होऊन विधानसभा निवडणुकीतही महायुतीचे पानिपत होईल, असा विश्वास किंवा अतिआत्मविश्वास महाविकास आघाडीला होता, मात्र निकाल त्याच्या विपरीत आले.

तब्बल २३० जागा जिंकत महायुतीला निर्विवाद बहुमत मिळाले. या निवडणुकीत 'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक हैं तो सेफ हैं' या भाजपच्या घोषणांमुळे मतांचे ध्रुवीकरण झाले वगैरे कारणमीमांसा महाविकास आघाडीकडून आपल्या दारुण पराभवाबद्दल देण्यात येत आहे. याचाच अर्थ सर्वसामान्य मतदारांना गृहित धरले जाते आणि कशाचाही प्रचार केला जातो. केवळ धर्म, देव आणि दैवते याच्याभोवतीच राजकारण फिरत आहे. त्यातही सोशल मीडियासारखे प्रभावी माध्यम हाती असल्याने लोकांच्या गळी काहीही उतरवता येते हे या राजकारण्यांच्या ध्यानी आले आहे.

याही निवडणुकीत सर्वसामान्यांचे प्रश्न कायम राहिले. शेतकर्यांच्या पिकाला भाव, शैक्षणिक दर्जा उंचावणे, बेरोजगारांच्या हाताला काम देणे हे प्रमुख मुद्दे पूर्णपणे दुर्लक्षिले गेले. ते फक्त जाहीरनाम्यापुरते मर्यादित राहिले. त्याबाबत एका नेत्यानेही अवाक्षर काढले नाही. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना गेम चेंजर ठरल्याचे महायुतीकडून सांगण्यात येते, पण महिलांचे प्रश्न, महिला बेपत्ता होण्याचे वाढते प्रमाण, त्यांची सुरक्षितता याबद्दलही कुठे कोणी काही बोलल्याचे दिसत नाही. उलटपक्षी महिलांबद्दल अनुद्गारच काढण्यात आले आणि त्यालाही हसून दाद दिली गेली, हा तर निर्लज्जपणाचा कळसच होता.

आता निवडणुकीचे सोपस्कार पार पडले आहेत. निकालही जाहीर झाले आहेत, पण २०१९ सारखेच घोडे मुख्यमंत्रिपदावरच अडले होते. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा याच पदासाठी अडून बसल्याचे सांगण्यात येत होते. भाजपला मात्र देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घालायची चर्चा होती. म्हणजेच 'निर्णय वेगवान, महाराष्ट्र गतिमान,' अशी घोषणा देणार्या महायुतीचा मुख्यमंत्रिपदाबाबत निर्णय होत नव्हता. शनिवारी निकाल लागल्यापासून बुधवारपर्यंत मुख्यमंत्रिपदाचा नुसताच घोळ सुरू होता.

२९ जून २०२२ मध्ये महाविकास आघाडी कोसळल्यानंतर लगेच दुसर्या दिवशी म्हणजे ३० जून २०२२ रोजी मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली. त्याआधी २३ नोव्हेंबर २०१९ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांना बरोबर घेत भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी सत्ता स्थापन केली. याची कल्पना कोणीही केली नव्हती. हीच तत्परता आता का दाखवली गेली नाही?याचे कारण म्हणजे प्रत्येकाचे हितसंबंध गुंतलेले आहेत. मला खुर्चीचा, सत्तेचा मोह नाही, असे सांगणार्या एकनाथ शिंदे यांनी कथितरीत्या मुख्यमंत्रिपदासाठी आडमुठी भूमिका का घेतली होती हे न उमगणारे कोडे आहे, तर दुसरीकडे भाजपनेही २०२२ मधील राष्ट्रीय कार्यकारिणीत महाराष्ट्राच्या विकासासाठी तसेच लोककल्याणासाठी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री म्हणून पाठिंबा दिल्याचे म्हटले आहे. शिवाय आपल्याला सत्तेची लालसा नाही, असेही म्हटले आहे. मग भाजपने मुख्यमंत्रिपदासाठी एवढे का ताणले? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# महावितरणची अभय योजनेत लाभ घेण्यासाठी उरले केवळ दोन दिवस

## व्याज,विलंब आकार माफीसह थकबाकी हप्त्यात भरण्याची सोय

### ३० नोव्हेंबरला संपणार योजना

**सहा हप्त्यात थकबाकी भरता येणार**

या योजनेत मुद्दल बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सोय आहे.

जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एक रकमी थकित बिल भरतील त्यांना दहा टक्के सवलत देण्यात येईल.

उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत मिळेल.-




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती,**

वीज बिलाच्या थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या वीज ग्राहकांना विलंब आकार आणि व्याज यांच्या माफीसह थकबाकीमुक्त करून पुनर्जिवीत करणारी महावितरणच्या अभय योजनेची मुदत शनिवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ ला संपत आहे. त्यामुळे पात्र थकबाकीदार लाभार्थ्यांना या योजनेत लाभ घेण्यासाठी ३० नोव्हेंबर पर्यंतच सहभाग नोंदवावा लागणार आहे.

राज्यात ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ही योजना आहे. थकित बिलांच्या योजनेत कृषी ग्राहकांचा समावेश नाही. योजनेचा कालावधी १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४ आहे.

अमरावती परिमंडळाअंतर्गत अमरावती व यवतमाळ जिल्ह्यात घरगुती,व्यावसायिक आणि औद्योगिक वर्गवारीतील अनुक्रमे ७१ हजार ४०४ आणि १ लाख ६ हजार ४३९ ग्राहकांना महावितरण अभय योजना २०२४ मध्ये सहभागी होऊन थकबाकीमुक्त होण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. थकबाकीदार ग्राहकांनी थकबाकीची मुद्दल रक्कम भरल्यास थकबाकीवरील व्याज आणि विलंब आकाराचे एकूण २२ कोटी ८४ लाख रुपये माफ होणार आहे. परंतू मागील तीन महिन्यात अमरावती जिल्ह्यातील १ हजार ९६ ग्राहकांनी १ कोटी ३५ लाखाचा भरणा केला आहे आणि यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ५० ग्राहकांनी ९३ लाख ५६ हजार भरून या योजनेत सहभाग नोंदविला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी जागेवरील वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. तथापि, थेट कायदेशीर कारवाई करण्यापूर्वी ग्राहकांना एक संधी म्हणून सवलतीची योजना लागू केली आहे.

# गहू, हरभरा, मका पिकासाठी पाण्याच्या पाळ्या किती आणि कधी द्याल? वाचा सविस्तर

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक** : रब्बी हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या गहू, हरभरा, ज्वारी, मका पिकांसाठी पाणी व्यवस्थापन महत्वाची गोष्ट असते. जर या उपलब्ध पाण्याचा योग्य वेळी योग्य वापर केल्यास उत्पादनांतही वाढ होण्यास मदत होते. म्हूनच पाण्याच्या पाळ्या खूप महत्वाच्या ठरतात. पाहुयात गहू, हरभरा, ज्वारी, मका पिकासह इतर पिकांसाठी पाणी किती आणि कधी द्यावे...

**ज्वारीसाठी** - ज्वारी पिकाची रब्बी हंगामातील (ठरललळ ड्शर-ीप) पाण्याची एकूण गरज ४० ते ४२ सेंटीमीटर असते आणि हे पाणी रब्बी ज्वारीला एकूण चार पाण्याच्या पाळयांमधून द्यावे. गर्भावस्था (पेरणीनंतर २८ ते ३० दिवसांनी), वाढीची अवस्था (५० ते ५५ दिवसांनी), फुलोरा (७० ते ७५ दिवसांनी) व दाणे भरण्याची अवस्था (९० ते ९५ दिवसांनी) या संवेदनक्षम अवस्थांनुसार ज्वारी पिकास पाणी द्यावे.

**गहू पिकासाठी** - गहू पिकाची संपूर्ण कालावधीत पाण्याची एकूण गरज ४० ते ४५ सेंटीमीटर एवढी असते आणि ही गरज पाण्याच्या एकूण चार पाळयांमधून भागवावी. मुकुटमुळे फुटणे (पेरणीनंतर १८ ते २१ दिवसांनी), कांडी धरताना (३५ ते ४२ दिवसांनी), पीक ओंबीवर येताना (६० ते ६५ दिवसांनी) व दाणे चिकात असताना (पेरणीनंतर ८० ते ८५ दिवसांनी) या गव्हाच्या पाणी देण्याच्या संवेदनक्षम अवस्था आहेत. या अवस्थांमधे गहू पिकास पाणी दयावे. ज्या शेतकरी बांधवांकडे गव्हासाठी एकच पाणी असेल त्यांनी ते कांडी धरताना द्यावे. दोन पाणी असतील तर पहिले पाणी मुकूटमुळे फुटताना आणि दुसरे पाणी पीक ओंबीवर येताना द्यावे. ज्या शेतकरी बांधवांकडे तीन पाणी असतील त्यांनी कांडी धरताना, मुकुटमुळे फुटताना आणि पीक ओंबीवर येताना ते द्यावेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




**मका पिकासाठी...**

मका पिकाची पाण्याची एकूण गरज ४० ते ४५ सेंटीमीटर एवढी असते आणि ही गरज एकूण पाण्याच्या चार पाळयांमधून भागवावी. मक्याच्या ज्या संवेदनक्षम वेगवेगळ्या अवस्था आहेत त्यामध्ये रोप अवस्था (पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी), तुरा बाहेर पडताना (४५ ते ५० दिवसांनी), फुलोरा (६० ते ६५ दिवसांनी) आणि दाणे भरताना (७५ ते ८० दिवसांनी) या संवेदनक्षम अवस्थेत मका पिकास पाणी द्यावे.

**हरभरा पिकासाठी...**

हरभरा पिकाची पाण्याची एकूण गरज २५ ते ३० सेंटीमीटर एवढी असते आणि ही गरज एकूण दोन पाण्याच्या पाळयांमधून भागवावी. हरभरा पिकास फांद्या फुटताना (पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी) व घाटे भरताना (६० ते ६५ दिवसांनी) या संवेदनक्षम अवस्थांमधे पाणी द्यावे. ज्या शेतकरी बांधवांकडे हरभऱ्यासाठी एकच पाणी असेल त्यांनी ते पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी पिकास फांद्या फुटताना द्यावे.

**करडई पिक्कासाठी...**

करडई पिकाची पाण्याची एकूण गरज २५ ते ३० सेंटीमीटर एवढी असते आणि हे पाणी करडई पिकास दोन पाण्याच्या पाळयांमधून द्यावे. करडईची लुसलुशीत वाढीची अवस्था (पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी) व पीक फुलोऱ्यात असताना (५० ते ६० दिवसांनी) करडई पिकास पाणी द्यावे.

सूर्यफुलाची....

सूर्यफुलाची पाण्याची एकूण गरज ३० ते ३५ सेंटीमीटर असते. ही पाण्याची गरज एकूण चार पाळयांमधून भागवावी. रोपावस्था (पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी), फुलकळ्या लागण्याची अवस्था (३० ते ३५ दिवसांनी), पीक फुलोऱ्यात असताना (४५ ते ५० दिवसांनी) व दाणे भरताना (६० ते ६५ दिवसांनी) या संवेदनक्षम अवस्थांमधे सूर्यफूलास पाणी दयावे.

**- डॉ. कल्याण देवळाणकर,**
सेवा निवृत्त शास्त्रज्ञ कृषी विद्यापीठ




## टाचांच्या भेगामुळे त्रस्त आहात?

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळ्यातील गुलाबी थंडी सर्वांना हवीहवीशी वाटते. पण, गुलाबी थंडी येताना अनेक आजार आणि त्वचेच्या समस्या घेऊन येते. त्वचेच्या समस्यांमध्ये त्वचा कोरडी पडणे, ओठ फुटणे, पायांच्या टाचांना भेगा पडणे यांसारख्या समस्या सुरू होतात. टाचांना भेगा पडण्याची समस्या तर टाचेचे सौंदर्य हरवतेच शिवाय हे दुखणे असह्य सुद्धा असते. अनेकदा तर अस्वच्छता, चुकीचं स्किनकेअर, कोरडेपणा आणि हार्मोन्समधील बदलाव यामुळे टाचांना भेगा पडतात. त्यामुळे जाणून घेऊयात, टाचांच्या भेगांवरील काही सोपे उपाय,



**भेगांवरील सोपे उपाय -**

टाचा फाटल्या असतील तर त्यात घाण अडकणार नाही याची काळजी घ्यावी. फाटलेल्या टाचांमध्ये घाण जमा झाल्यास समस्या अधिक गंभीर होऊ शकतो.

पायांना दररोज न चुकता मॉइश्चरायजर लावावे.

दररोज पाय २० मिनिटे कोमट पाण्यात ठेवावेत. यामुळे पायांना आराम मिळतो.

टाचांवर तुम्ही केळी स्मॅश करून लावू शकता. फाटलेल्या पायांवर भेगा पडल्यास लावलेला केळीचा मास्क अत्यंत उपयुक्त ठरतो.

फाटलेल्या भेंगावर क्रॅक हिल क्रिम तुम्ही लावायला हवी. क्रॅक हिल क्रिम टाचांना सुंदर आणि मुलायम बनवते. यासाठी रोज रात्री पाय पूर्णपणे कोरडे करून घ्यावेत. यानंतर हलक्या हातांनी क्रीम लावावे.

घरातील फरशी थंड असते. अशावेळी तुम्ही घरात स्लिपर वापरायला हवी. यामुळे टाचा फाटत नाही.

तुम्हाला मधाचा वापर करता येईल. मध हे उत्तम मॉइश्चरायजर आहे. मधाच्या वापरामुळे त्वचेचं पोषण होते. यासाठी अर्धा कप मध पाण्यात घाला. या पाण्यात किमान १५ मिनिटे पाय ठेवून बसावे. यामुळे टाचांच्या भेगांपासून आराम मिळेल.

टाचांना भेगा पडू नयेत यासाठी हे करा -

टाचांची नियमित स्वच्छता करणे आवश्यक आहे.

आठवड्यातून दोन वेळेस टाचा स्क्रबरने अवश्य घासाव्यात.

टाचा स्क्रबरने घासताना थेट घासू नयेत. आधी कोमट पाण्यात मीठ घालावे आणि त्यात पाय बुडवून ठेवावेत.

# आदर्श शिक्षकांच्या वेतनवाढीकरीता जि.प.च्या सामान्य निधीत तरतुद करा:राज्य शासनाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** - जिल्हा स्तरावर आदर्श शिक्षकाचा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या शिक्षकांना वेतनवाढ देण्यासाठीची तरतूद सामान्य निधीतून केली जावी, असे निर्देश शासनाने दिले आहेत.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे जारी करण्यात आलेल्या एका अधिसूचनेत हे निर्देश देण्यात आले आहेत. या विभागाच्या उपसचिव नीला रानडे यांची त्यावर स्वाक्षरी आहे. या अधिसूचनेनुसार २०१८ सालापर्यंत ज्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. त्यांना वेतनवाढ देण्याची तरतूद केली जावी, असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत.या आदेशानुसार अंमलबजावणीचे निर्देश यापूर्वीही देण्यात आले होते. परंतु त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही, अशी शासनाची माहिती आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सामान्य निधीतून ही तरतूद केली जावी, असे निर्देश राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत. जिल्हा स्तरावर आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना वेतनवाढ दिली जायची. परंतु दरम्यानच्या काळात ती बंद करण्यात आली होती. त्या निर्णयाला काही शिक्षकांनी आव्हान दिले होते. त्यानुसार न्यायालयाने शासनाला निर्देश दिले, अशी संबंधित शिक्षकांची माहिती आहे.




# केवळ नंबर सेव्ह करा अन् पिकविम्याचे स्टेटस व्हॉट्सपवर पहा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** - पीकविमा संदर्भातील बारीक सारीक गोष्टीसाठी आता कुठेही जायची गरज नाही. किंवा कोणत्याही वेबसाईटवर लॉगिन करण्याची गरज नाही. कारण आता पीक विमा स्टेट्स आपल्या व्हाट्सअप वर चेक करता येणार आहे. झचऋझध च्या माध्यमातून व्हाट्सअप चॅट बोट चालू करण्यात आला आहे. यासाठी एक नंबर प्रकाशित करण्यात आला आहे.

### व्हाट्सअपवर कसे चेक करायचे?

सर्वप्रथम Pmfby Whats-pp chat boat ७०६५५१४४४७ हा नंबर आपल्या संपर्क यादीमध्ये जतन करायचा आहे. (तुम्हाला सोयीस्कर होईल या नावाने सेव्ह करायचा आहे.)

यानंतर आपल्या मोबाईलमधील व्हाट्सअप उघडायचे आहे. यात आपण सेव्ह केलेला नंबर काढायचा आहे.




नंबर काढल्यानंतर त्यावर कळळ असा मेसेज पाठवायचा आहे. लागलीच लागलीच PMFBY चा रिप्लाय येईल.

यानंतर आपल्यासमोर आलेल्या रिप्लायमध्ये पॉलिसी स्टेटस, इन्शुरन्स पॉलिसी आणि सी ऑल ऑप्शन्स असा पर्याय दिसेल.

सी ऑल ऑप्शन्सवर क्लिक केल्यानंतर इतर सर्व पर्याय दिसतील. (यामध्ये पॉलिसी स्टेटस, इन्शुरन्स पॉलिसी, क्रॉप लॉस इंटीमेशन स्टेटस, क्लेम स्टेटस इत्यादी.)

यातील एक उदाहरण पाहूया. जसे की, पॉलिसी स्टेटसवर क्लिक केल्यानंतर पुन्हा आपल्याला रिप्लाय येईल.

यात रब्बी २०२४, खरीप २०२४ किंवा इतर पर्याय असे ऑप्शन दिसेल.

यानंतर आपण पुढील पर्यायांमध्ये २०२१ पासून ते २०२४ पर्यंतचे रब्बी किंवा खरीप हंगामातील सर्व स्टेटस पाहता येतील.

यातील कोणत्याही एकावर क्लिक केल्यास संबंधित पीक विमा अर्जाची इत्यंभूत माहिती उपलब्ध होईल.

अशा पद्धतीने आपण खरीप रब्बी-हंगामातील विविध पीक विम्याची स्थिती व्हाट्सअपवर पाहू शकता.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २८ नोव्हेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# १८ केंद्रामध्ये ४२४ शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**


शासनदराने सोयाबीनची खरेदीकरण्यासाठी जिल्ह्यात २० केंद्रे सुरु करण्यात आली व यासाठी १० हजारांवर शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली. त्या तुलनेत १८ केंद्रामध्ये फक्त ४२४ शेतकऱ्यांच्या १५ हजार किंटल सोयाबीनची खरेदी करण्यात आली. विशेष म्हणजे खुल्या बाजारात सोयाबीन मातीमोल भावाने विकले जात आहे. शासनाने यावर्षी ४,८९२ रुपये किंटल असा सोयाबीनचा हमीभाव जाहीर केला आहे. प्रत्यक्षात वर्षभर शेतकऱ्यांना हमीभाव मिळालेला नाही. आता हंगाम सुरु होताच सोयाबीनचे दर ३८०० रुपयांवर आले. शासनखरेदी देखील उशीराने सुरु झाल्याने सोयाबीन मातीमोल झाले. आता ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन नोंदणीची मुदत देण्यात आलेली आहे. त्यातच १६ नोव्हेंबरला आर्द्रतेची अट १२ टक्यांवरुन १५ टक्क्यांवर आणण्यात आलेली आहे. तरीही शासन खरेदी केंद्रांवर सोयाबीन खरेदीची मंदगती कायम आहे. शासनाने १५ ऑक्टोंबरपासून सोयाबीन खरेदीच्या सूचना केल्या असल्या तरी प्रत्यक्षात काही केंद्रांवर २२ ऑक्टोंबरपासून सोयाबीनची खरेदी सुरु झाली व आर्द्रतेच्या निकषात सोयाबीन खरेदी केंद्रावरुन घरी परत नेण्याची वेळ शेतकऱ्यांवर ओढवली होती. आता केंद्र शासनाने आर्द्रतेचा निकष १५ टक्क्यांवर आणलेला आहे. तसेच सोयाबीनमधील आर्द्रताहीकमी झाल्याने पुन्हा केंद्रावर खरेदी सुरु झालेली आहे. व्हीएमएफच्या ११ केंद्रावरुन ५,३४३ शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली असली तरी प्रत्यक्षात ३३८ शेतकऱ्यांच्या ५,६६८ किंटल सोयाबीनची खरेदी करण्यात आलेली आहे. यामध्ये एकाही केंद्रावर १०० किंटल खरेदी झालेली नाही. डीएमओच्या नऊ केंद्रांवर ५,२६३ शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली असली तरी खरेदी मात्र ४०३ शेतकऱ्यांच्या ६४६६ किंटलची करण्यात आलेली आहे. फक्त नांदगांव खंडेश्वर केंद्रावर अधिकतम २१७ शेतकऱ्यांच्या मालाची खरेदी करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना खुल्या बाजारात हमी भावापेक्षा कमी भावात सोयाबीन विकावे लागत आहे.

# मुख्यमंत्रीपदाबाबत अमित शाह आणि विनोद तावडे यांच्यात चर्चा

## भाजपा धक्कातंत्र अवलंबणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ नवी दिल्ली –** विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळवल्यानंतर महायुतीमध्ये मुख्यमंत्रीपदावरून जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली. २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागल्यानंतर मुख्यमंत्रीपदाबाबतचे मळभ दूर व्हायला चार दिवस लागले. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल (दि. २७ नोव्हेंबर) पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्रीपदाबाबत पंतप्रधान मोदी जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य असेल असे सांगितले. शिंदेंनी मुख्यमंत्रीपदावरचा दावा सोडल्यानंतर आता भाजपामध्ये मुख्यमंत्रीपदी कुणाला बसवायचे, याची चर्चा सुरू झाली आहे. भाजपाचे महाराष्ट्रातील नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर जोर देत असताना केंद्रीय नेतृत्व मात्र सर्व बाजूंचा विचार करताना दिसत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यात काल याविषयावर दीर्घ चर्चा झाल्याची माहिती वृत्तवाहिन्यांनी दिली आहे.

एबीपी माझा वृत्तवाहिनीने दिलेल्या बातमीनुसार, बुधवारी रात्री अमित शाह आणि विनोद तावडे यांच्यात ४० मिनिटे चर्चा झाली. बिगर मराठा मुख्यमंत्री केल्यास त्याचा मराठा मतांवर काय परिणाम होईल, याचा आढावा शाहांनी घेतला असल्याची माहिती मिळत आहे. आगामी निवडणुका, फडणवीसांचा चेहरा आणि मराठा-ओबीसी मतांबाबत शाहांनी माहिती घेतली. एकीकडे देवेंद्र फडणवीस यांचीच मुख्यमंत्रीपदी वर्णी लागणार अशी जोरदार चर्चा असताना केंद्रीय नेतृत्वाने राज्यातील समीकरणे जाणून घेतल्याबद्दल भाजपाकडून इतर राज्यांप्रमाणेच धक्कातंत्राचा वापर केला जाणार का? यावर आता राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.



### इतर राज्यातील प्रयोग महाराष्ट्रात होणार?

मागच्या दोन वर्षांत भाजपाने इतर राज्यांमध्ये प्रस्थापित नेतृत्वाला बाजूला करून नवे नेतृत्व दिले आहे. मध्य प्रदेशमध्ये त्यांनी शिवराज सिंह चौहान यांच्या जागी डॉ. मोहन यादव, छत्तीसगडमध्ये रमण सिंह यांच्याऐवजी विष्णू देव साय, राजस्थानमध्ये वसुधंरा राजे यांच्याऐवजी भजनलाल शर्मा आणि हरियाणामध्ये मनोहरलाल खट्टर यांना बाजूला सारून नायब सिंह सैनी यांना मुख्यमंत्रीपद दिले गेले. भाजपाने इतर राज्यात ज्याप्रमाणे धक्कातंत्राचा वापर करून नवे नेतृत्व समोर आणले, तसाच प्रयोग महाराष्ट्रात होणार का? हे येणाऱ्या दिवसांत समजू शकेल.

### फडणवीस यांना विजयी करा, अमित शाहांचे ते विधान

दरम्यान, अमित शाह हे आता मुख्यमंत्रीपदाबाबत चर्चा करत असले तरी त्यांनीच विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात देवेंद्र फडणवीस यांचा विजय करा, असे उद्गार शिराळा येथील सभेत काढले होते. या विधानामुळे महायुतीत काही वेळ चलबिचल पाहायला मिळाली होती. अमित शाह यांनी अप्रत्यक्षपणे भाजपाचा मुख्यमंत्री होणार असल्याचे संकेत दिले, असे त्यावेळी म्हटले गेले. त्यानंतर भाजपाने लगेच त्यावर स्पष्टीकरण देत सारवासारव केली.

# विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुख्मिणी महोत्सव २०२४ चे भव्य आयोजन

## नयनरम्य बोटिंग शो (नौका स्पर्धा) व १ लाख दिव्यांचा दीपोत्सव ठरणार महोत्सवाचे आकर्षण:

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती –** विदर्भाची पुरातन राजधानी माता रुक्मिणीचे माहेरघर आणि कुलस्वामिनी अंबिका मातेचे शक्तिपीठ असलेल्या अमरावतीच्या तिवसा तालुक्यातील श्रीक्षेत्र कौंडण्यपुर येथे कार्तिक यात्रे मध्ये दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा होणारा महोत्सव विदर्भाचा विदर्भाच्या पुरातन राजधानीचा नामक अंबा रुक्मिणी महोत्सव २०२४ चे आयोजन दिनांक २९, ३०

### कौंडण्यपूर येथे महोत्सव विदर्भाचा....

नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर दरम्यान करण्यात आले आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमांमध्ये सर्वप्रथम नयनरम्य बोटिंग शो म्हणजेच नौका स्पर्धाचे आयोजन ज्यामध्ये विजेत्या बोटिंगला आकर्षक बक्षिसे (प्रथम बक्षीस ११,००१ रुपये, द्वितीय बक्षीस ५००१ रुपये, तृतीय बक्षीस ३००१ रुपये) त्यानंतर एक लाख दिव्यांचा दीपोत्सव, त्यानंतर अंबा रुक्मिणी प्रतिमेचे नौका प्रदर्शन अशा नयनरम्य कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २९ नोव्हेबर रोजी दुपारी ४.०० वाजता करण्यात आले असून सायंकाळी ६.०० वाजता उद्घाटन समारंभ संपन्न होणार असून या संपूर्ण समारंभाचे स्वागताध्यक्ष रविराज हिम्मतराव देशमुख (प्रदेश उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र) हे राहणार आहे. त्यानंतर सायंकाळी ७. ०० वाजता मैफिल स्वरांची नामक बहारदार संगीत रजनी चे आयोजन करण्यात आले असून यामध्ये सुप्रसिद्ध गायक व संगीकार राहुल तायडे व संच (अमरावती) यांचा सहभाग असणार आहे. त्यानंतर दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ६.०० वाजता विदर्भस्तरिय भव्य एकता मॅरेथॉन (खुला गट) चे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विजेत्या स्पर्धकांना हजारो रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ८.०० वाजता महाराष्ट्र ग्राम दर्पण व अंबा रुक्मिणी महोत्सव समिती, सर्व मंदिर समिती अध्यक्ष व पदाधिकारी तसेच सर्व शालेय विद्यार्थ्यांच्या वतीने भव्य स्वच्छता अभियान व नदी घाट सफाई मिशन राबविण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता रविराज देशमुख मित्रपरिवार, अंबा रुक्मिणी सांस्कृतिक महोत्सव समिती, स्व. शालिनीताई मेघे हॉस्पिटल नागपूर, जीवन आधार बहुद्देशीय संस्था नागपूर व महाराष्ट्र ग्राम दर्पण यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य महाआरोग्य रोगनिदान व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये तब्बल ७५ तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार असून यामध्ये सर्व तपासणी निःशुल्क असणार आहे.

त्याचबरोबर मोफत चष्मे वाटप सुद्धा करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ज्या रुग्णांची शस्त्रक्रिया करायची आहे. त्यांची मोफत शस्त्रक्रिया व त्यांची जाण्याची, राहण्याची व खाण्याची व्यवस्था सुद्धा मोफत करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६.०० वाजता स्थानिक कलावंतांचा सांस्कृतिक कार्यक्रम व लोककला दर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यानंतर तिसऱ्या दिवशी सकाळी ९.०० वाजता शस्त्रक्रियेसाठी ज्या रुग्णांना नागपूर येथील उच्च दर्जाच्या स्व. शालिनीताई मेघे हॉस्पिटल पाठवायचे आहे. त्यांना मोफत बसद्वारे रवाना करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता भव्य रांगोळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये विजेत्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे.

त्यानंतर दुपारी २.०० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर आधारित भाऊसाहेब या चित्रपटाचे ऑडिशन ठेवण्यात आले असून यामध्ये स्थानिक कलावंतांना चित्रपटात काम करण्याची संधी मिळणार आहे. आणि त्यानंतर सायंकाळी ६.०० वाजता समारोप व बक्षीस वितरण संपन्न होणार आहे. सदर पत्रकार परिषदेला अंबा रुख्मिणी २०२४ चे स्वागताध्यक्ष रविराजभाऊ देशमुख (प्रदेश उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र), अक्षय पुंडेकर, श्री गजाननराव बांबल, श्री संतोषभाऊ मठिये, श्री अंकुशभाऊ देऊळकर, सचिनदादा इंगळे, अमोलभाऊ पुंडेकर, रोशनभाऊ भगत, आकाश भाऊ ठाकरे, प्रशांत भाऊ ठाकरे आदींची उपस्थिती होती.

## उद्या पासून तीन दिवस रंगारंग कार्यक्रमांची मेजवान



# तर मी त्यांना माझ्या पराभवाचं श्रेय दिलं असतं

## रवी अन् नवनीत राणांबाबत बच्चू कडू नेमकं काय म्हणाले?

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२८ अमरावती –** राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार विजय मिळत सत्ता राखली. तर दुसरीकडे लोकसभा निवडणुकीत अविश्वसनीय कामगिरी करणाऱ्या महाविकास आघाडीचा विधानसभेत धुव्वा उडाला. याचबरोबर निवडणुकीपूर्वी एकनाथ शिंदे आणि महायुतीशी जवळीक साधणारे प्रहार जनशक्तीचे अध्यक्ष बच्चू कडू यांनाही तब्बल चार निवडणुकीनंतर पराभवाचा फटका सहन करावा लागला आहे. दरम्यान आमदार रवी राणा यांनी दावा केला होता की, बच्चू कडू यापुढे विधानसभेत दिसणार नाहीत. आता माजी आमदार बच्चू कडू यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर माध्यमांशी बोलताना बच्चू कडू म्हणाले, त्यांनी विनाकारण माझ्या पराभवाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये. कारण संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र बदलले आहे. राज्यातील निकाल वेगळे लागले असते आणि मी पराभूत झालो असतो तर राणांना श्रेय दिले असते. पण हपापलेले लोक उगाचच बच्चू कडूंना आम्ही पाडले म्हणत श्रेय घेत आहेत. त्यांची औकात नाही आम्हाला पाडण्याची. जर असेल तर त्यांनी कोणताही मतदारसंघ सांगावा, मी तिथून उभा राहतो.अस बच्चू कडू म्हणालेत.



# नाशिक, नगर, पुण्यात थंडीच्या लाटेची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ नागपूर –** उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्रात पारा नऊ अंशांपर्यंत खाली आला आहे. बुधवारी (२७ नोव्हेंबर)नगरमध्ये राज्यात सर्वांत कमी ९.४ तर पुण्यात ९.९ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. पुढील दोन दिवसांत नाशिक, नगर, पुण्यात थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.



हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा झंझावात वेगाने राज्यात येत असल्यामुळे राज्यात गारठा वाढला आहे. बुधवारी नगरमध्ये सर्वांत कमी ९.४ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. त्या खालोखाल पुण्यात ९.९, जळगाव ११.०, सातारा १२.०, औरंगाबाद १२.२, परभणी ११.६, नागपूर ११.७, अमरावती १२.६ गोंदिया ११.९ आणि अकोल्यात १३.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे.

उत्तरेकडील थंड वाऱ्याचा जोर आणखी दोन दिवस कायम राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, नगर आणि मध्य महाराष्ट्रातील पुण्यात पुढील दोन दिवसांत थंडीची लाट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्या नंतर बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या वादळामुळे राज्यात बाष्पयुक्त हवा येऊन थंडी काही प्रमाणात कमी होण्याचा अंदाज आहे. पण, सध्यातरी पुढील दोन दिवस थंडीत काहिशी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी व्यक्त केली आहे.

# वरुड- अमरावती रोडवरील लाखारा फाट्यानजीक अपघात

## आयशर - पिकअपची टक्कर, तिघांचा जागीच मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ वरुड,–** आयशर आणि पिकअपच्या धडकेत तिघांचा मृत्यू तर अनेक जण गंभिर जखमी झाल्याची घटना तालुक्यातील बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अमरावती रोडवरील लाखारा फाट्यानजीक रात्री ९ वाजताचे सुमारास घडली. या अपघातात अचलपूर येथील दोन तर पांढरघाटी येथील एकाचा मृत्यू झाल्याचे कळते. या अपघातामुळे पुन्हा सर्वसामान्य नागरिकांमध्ये भिती निर्माण झाली असून अवैध वाहतुकीवर आळा घालण्याची मागणी होत आहे.प्राप्त माहीतीनुसार, रात्री ९ वाजताचे सुमारास एम.एच. ३७एक्स ३०७५ क्रमांकाचा आयशर ट्रक वरुड येथून अचलपूरकडे तर एम.एच.२७ बीएक्स ९१७१ क्रमांकाचा पिक अप वाहन मोर्शी कडून वरूडकडे जात असतांना बेनोडा (शहीद) पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अमरावती रोडवरील लाखारा फाट्यानजीक अचानक दोन्ही वाहन अनियंत्रीत व भरधाव वेगात एकमेकांसमोर धडकले.



ही धडक एवढी जोरदार होती की, दोन्ही वाहनातील तीन मजुरांचा मृत्यू तर सहा गंभीर जखमी तर काही किरकोळ जखमी झोले. यामध्ये राजेश रमेशराव युवनाते २० रा. पांढरघाटी ता. वरुड, तौफीक शहा फारूख शहा ३२ रा. रायपुरा अचलपुर आणि शेख नाजिम शेख साबीर ४० रा. बिलासपुरा अचल यांचा मृत्यू झाला. तर यातील मोहम्मद नासीर मोहम्मद साबीर ४५, मोहम्मदनिसार मोहम मतीन ३८, मोहम्मद कैसर मोहम्मद मतीन ४५ तिन्ही रा. अचलपुर यांना पुढील उपचारा नागपूर येथे रवाना करण्यात आले. तर मोहम्मद आबीद ४९, मोहम्मद मुजाहीद २५ अ मोहम्मद अरशद २८ सर्वरा. अचलपुर यांचेवर वरूड ग्रामीण रुग्णालयात उपचार सु आहे. या घटनेचा पुढील तपासबेनोडा (शहीद) पोलीस करीत आहे.

# ‘एडीआर’चा धक्कादायक अहवाल; महाराष्ट्रातल्या १८७ नवनिर्वाचित आमदारांवर गुन्हे

## ११८ MLA वर महिला अत्याचार, खून, भ्रष्टाचाराचे गंभीर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ मुंबई –** देशभर गाजलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स अर्थातच एडीआरचा एक धक्कादायक अहवाल आलाय. त्यांनी २८८ आमदारांपैकी नवनिर्वाचित १८७ आमदारांवर विविध स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याचे म्हटले आहे. ’एडीआर’ने आमदारांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रातील तपशीलांचा अभ्यास केला. तेव्हा अतिशय भयंकर असे वास्तव समोर आले.

विशेष म्हणजे नव्या आमदारांपैकी ११८ जणांवर महिलांवर अत्याचार, भ्रष्टाचार, खून, खुनाचा प्रयत्न, निवडणूक संदर्भात गुन्हे दाखल आहेत.

एकीकडे मुख्यमंत्री कोण होणार, याची चर्चा जोरात सुरूय. विरोधीपक्ष अजूनही पराभवाच्या धक्क्यातून सावरलेले नाहीत. मात्र, दुसरीकडे आपण निवडून दिलेल्या आमदारांचे प्रताप पाहिले, तर सर्वसामान्य माणूस कोमात गेल्या शिवाय राहणार नाही.

### शिंदे, दादांचा पक्षही शर्यतीत

शिवसेना शिंदे यांचे ५७ आमदार विधानसभा निवडणुकीत विजयी झाले. त्यांच्याही ३८ आमदारांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. सोबतच त्यांच्याही एकूण ४७ टक्के आमदारांवर गंभीर गुन्हे दाखल असल्याचे या अहवालात म्हटले आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४१ आमदार जिंकले. त्यातल्या २० आमदारांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

### शिवसेना ठाकरेंच्या १३ आमदारांवर गुन्हे

विधानसभा निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे २० आमदार विजयी झालेत. त्यांच्या १३ आमदारांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे समजते. काँग्रेसचे १६



आमदार विजयी झालेत. त्यांच्या ९ आमदारांवर विविध गुक्हे दाखल आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे १० आमदार विजयी झालेत. त्यांच्या ५ आमदारांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे अहवालात म्हटले आहे.

### अजित पवारांचे आमदार करोडपती

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने आपल्या अहवालात म्हटले आहे की, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे सगळेच आमदार हे करोडपती आहेत. भाजप आणि शिवसेनेचे ९८ टक्के आमदार करोडपती असल्याचे म्हटले आहे.

काँग्रेसचे साजिद पठाण हे सर्वात गरीब आमदार ठरलेत. त्यांची एकूण मालमत्ता फक्त ९ लाखांची असल्याचे अहवालात म्हटले आहे. तर भाजपचे श्याम खोडे यांची मालमत्ता ३१ लाख आणि गोपीचंद पडळकर यांची मालमत्ता ६५ लाखांची असल्याचे म्हटले आहे.

### भाजपच्या ९२ आमदारांवर विविध गुन्हे

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूक निकालात भाजप सर्वात मोठा राजकीय पक्ष ठरला. त्यांचे १३२ आमदार निवडून आले. मात्र, यातल्या ९२ आमदारांवर विविध गुन्हे दाखल आहेत. त्यातही ४० टक्के आमदारांवर गंभीर गुन्हे दाखल असल्याचे या अहवालातून समोर आले आहे.

### रोहित पाटील सर्वात तरुण आमदार

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ हे वयोमानानुसार सर्वात ज्येष्ठ ठरलेत. त्यांचे वय ७७ वर्षांचे आहे. त्या खालोखाल दिलीप सोपल (वय ७५), गणेश नाईक (वय ७४) यांचा नंबर लागतो. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहित पाटील हे सर्वात तरुण आमदार ठरलेत. त्यांचे वय २५ वर्ष आहे. त्यानंतर भाजपचे करण देवतळे (वय २९), राघवेंद्र पाटील (वय ३१) आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे वरुण देसाई (वय ३२) यांचा नंबर लागतो. आमदारांमध्ये एकूण २२ महिला असल्याची नोंदही या अहवालात आहे.

# सुंभ जळाला तरी पीळ जात नाही: सुप्रिया सुळे या फेक नरेटिव्ह कंपनीच्या डायरेक्टर, रुपाली चाकणकरांचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ मुंबई–** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांचा निकाल जाहीर झाला आणि महायुती पुन्हा एकदा सत्ता स्थापन करणार आहे. मुख्यमंत्री कोण होणार यावर चर्चा सुरू असून लवकरच यावर निर्णय घेतला जाणार आहे. मात्र यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी टीका केली आहे. एकनाथ शिंदे यांना भाजपने शब्द दिला होता की नव्हता माहीत नाही, पण उद्धव ठाकरे २०१९ साली हेच सांगत होते की शब्द दिला होता.

यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी सुप्रिया सुळे यांना प्रत्युत्तर दिले आहे. रुपाली चाकणकर म्हणाल्या, सुप्रिया सुळे या फेक नरेटिव्ह कंपनीच्या डायरेक्टर आहेत. आमची महायुती मजबूत आहे आणि सरकार स्थापनेची काळजी करू नका. जेवढे निवडून आलेत तेवढे व्यवस्थित सांभाळा. जनतेने तुम्हाला का नाकारले आहे, यावर चिंतन करा. कारण सध्या तुमच असं झालय सुंभ जळाला तरी पीळ काही जात नाही, अशा शब्दात टीका केली आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या होत्या, एकनाथ शिंदे साहेबांचा चेहरा घेऊन महायुती उभी राहिली आहे. त्याला यश मिळाले. त्यांचा चेहरा घेऊनच सगळे जनतेसमोर गेले होते. एकनाथ शिंदे यांना भाजपने कोणत्याही प्रकारचा शब्द दिला नव्हता, असे भाजपचे नेते म्हणत आहेत, शब्द दिला होता की नाही हे मला माहित नाही. पण २०१९ साली उद्धव ठाकरे हेच सांगत होते की, मला शब्द दिला होता.

दरम्यान, आज दिल्ली येथे महायुतीच्या नेत्यांची महत्त्वाची बैठक होणार आहे. या बैठकीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री कोण होणार हे देखील याच बैठकीत ठरू शकते. एकनाथ शिंदे यांनी देखील आज पत्रकात्र परिषद घेत भाजपला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



# शेगाव येथील रेल्वे स्टेशनवर दिव्यांगांसाठी लिफ्टची सुविधा

## दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन; प्रवाशांत आनंद



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ शेगाव–** शेगाव रेल्वे स्टेशनवर लिफ्ट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे स्थानकावरील प्रवाशांच्या सोयी–सुविधांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या लिफ्टचे उद्घाटन रेल्वे विभागातील दिव्यांग कर्मचारी गणेश बेलोकर यांच्या हस्ते करण्याचा निर्णय शेगाव रेल्वे स्टेशनचे प्रबंधक मोहन देशपांडे यांनी घेतला होता.


लिफ्टच्या उद्घाटन सोहळ्यात रेल्वे स्टेशनचे ट्रॅफिक इन्चार्ज पी.एम. पुंडकर, स्टेशनचे एसएसई (इलेक्ट्रिकल) शुभम डाखोडे, डेप्युटी एसएस राजेश देशपांडे, सिटी आय एन.आर. कराळे, जॉन्सन लिफ्ट कंपनीचे एमडी बाला, शेगाव रेल्वे पोलिस स्टेशनचे ठाणेदार विवेकानंद राळेभात, भिका बनकर, रमेश उबाळे,राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष माधुरी शर्मा, विदर्भ प्रदेशाध्यक्ष मनीषा टाकसाळ, शेगाव तालुका अध्यक्ष प्रीती तिवारी, मलकापूर तालुका अध्यक्ष वैशाली जोशी, परतवाडा तालुका अध्यक्ष रुपाली डांगे ,राष्ट्रीय रेल्वे प्रवासी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमार व्यास, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जवाहरलाल थानवी आदी मान्यवर उपस्थित होते.

या लिफ्ट सुविधेमुळे प्रामुख्याने वृद्ध, दिव्यांग, महिलांसह सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. स्टेशनवर असलेल्या विविध प्लॅटफॉर्म्स वर जाण्यासाठी ही लिफ्ट अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

# बनावट सोने विक्री, एटीएम बदलणारे दोन चोरटे जेरबंद: खामगाव शहर पोलिसांची कारवाई; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बुलढाणा–** खामगाव बनावट सोने असली सोने असल्याचे भासवून लोकांची फसवणूक करणे, चोरी करणे तसेच एटीएमची अदलाबदल करून फसवणूक करणाऱ्या दोन अट्टल चोर पोलिसांच्या जाळ्यात सापडले आहेत. खामगाव शहर पोलिसांनी ही कारवाई केली असून सोन्या–चांदीच्या दागिन्यांसह सुमारे पाच लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शहर पोलिस स्टेशनचे कर्मचारी २६ नोव्हेंबर रोजी दुपारी स्टेट बँकेच्या मुख्य शाखेजवळ पेट्रोलिंग करत असताना बैंक परिसरात त्यांना संशयितरित्या दोन व्यक्ती फिरताना दिसून आले होते. त्यांना जाळ्यात घेण्यापूर्वीच ते निसटले होते. पेट्रोलिंग दरम्यान नांदुरा रस्त्यावरील स्टेट बँक एडीबी शाखेच्या एटीएम कक्षासमोर परत तेच दोन संशयास्पदरीत्या इसम बसलेले आढळून आले. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता ते दुसऱ्या राज्यातील अट्टल चोर असल्याचे समोर आले. त्यांनी आपली नावे पप्पुराम अर्जुनलाल जाट (वय ३२), रा. केमुनिया ता. रायपूर जि. भिलवाडा राजू बालू जाट (वय ४१) रा. बिडकाखेडा ता.जि. भिलवाडा, राजस्थान असल्याचे सांगितले. हे दोघे बनावट सोने विक्री करून लोकांची फसवणूक करीत व एटीएम कार्डची हेराफेरी करून पैसे लंपास करत



असल्याचे तपासात समोर आले. त्यांच्या विरूद्ध गुजरात व राजस्थानमध्ये गुन्हे दाखल आहेत. तर या दोघांनी २६ नोव्हेंबर रोजी सकाळी अकोला येथे एकाची ४० हजाराने फसवणूक केल्याची कबुली दिली. पोलिसांनी नगदी ९० हजार, सोन्या–चांदीचे दागिने ३ लाख ६० हजार ५६८ रूपये, दुचाकी ५० हजार रूपये, २ मोबाइल व इतर साहित्य असा ५ लाख २ हजार ५६८ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोघांना अटक करण्यात आली. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी विनोद ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रामकृष्ण पवार यांच्या आदेशान्वये एपीआय भागवत मुळीक, पोहेकॉ. गजानन बोरसे, सागर भगत, पोकॉ. रवींद्र कन्नर, गणेश कोल्हे,राहुल थारकर, अमरदीपसिंह ठाकूर, अंकुश गुरूदेव यांनी केली आहे.

# जिल्ह्यात स्वच्छ माझे अंगण अभियान चळवळ:

## गावांमध्ये होणार स्वच्छ कुटुंबाचा सन्मान, प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती–** शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या संकल्पनेतून व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील गाव स्तरावरील सर्व कुटुंब स्तरावर वैयक्तिक शौचालय, घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन स्वच्छतेची सवय अंगीकृत करण्यासाठी व या मधून लोक चळवळ उभी करण्याच्या उद्देशाने गाव स्तरावर विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यानुसार स्वच्छ माझे अंगण अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये गावातील कुटुंबांचा सन्मान करण्यात येणार आहे.

‘स्वच्छ भारत मिशन’ ग्रामीण टप्पा २ अंतर्गत जिल्ह्यात ज्या कुटुंबानी वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डा, परसबाग, पाझर खड्डा, घनकचरा व्यवस्थापना करिता कंपोस्ट खत खड्डा अथवा घरगुती खत खड्डा तसेच कुटुंब स्तरावर कचराकुंड्या या बाबतची उपलब्धता करून घेतली. अशा



कुटुबाना प्रोत्साहन देत इतरही कुटुंबांनी त्यांचे अनुकरण करण्याच्या उद्देशाने हे अभियान राबवण्यात येत आहे. देखभाल दुरुस्ती करण्यासाठी कुटुंबाने पुढाकार घेणे, घरगुती स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कुटुब स्तरावर सुका कचरा, ओला कचरा कुंड्यांमध्ये वर्गीकरण करणे, वर्गीकरण केलेल्या घरगुती कचऱ्याचे कंपोस्ट खत खड्डा किंवा घरगुती खतखड्डा निर्मिती करून कचऱ्याचे, घर किंवा घराच्या परिसरात व्यवस्थापण करणे, परसबाग, पाझर खड्डा, शोष खड्डा या द्वारे घरगुती स्तरावर सांडपाणी व्यवस्थापन करणे या बाबींवर विशेष भर देण्यात येणार आहे.

कुटुंब निवडीचे निकष संबधित कुटुंबाकडे घरात अथवा परीसरात खालील बाबी असणे आवश्यक आहे. यामध्ये घरगुती खतखड्डा, परसबाग, वैयक्तिक शोषखड्डा, पाझर खड्डा, वैयक्तिक शौचालय, घरगुती कचराकुंड्या इत्यादी.

# अमोल मिटकरींना पार्थ पवारांनी झापले:माध्यमांना बाईट न देण्याचा दिला इशारा, मिटकरींच्या लेखावरून पेटला वाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८मुंबई–** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससाठी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कॅम्पेन करणाऱ्या डिझाईन बॉक्स कंपनीचे प्रमुख नरेश अरोरा यांनी निवडणुकीत मिळालेल्या यशाबद्दल अजित पवारांची भेट घेत शुभेच्छा दिल्या आहेत. मात्र, यावेळी नरेश अरोरा यांनी अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवल्याने वाद निर्माण झाला आहे. अमोल मिटकरी यांनी अरोरा यांना यावरून सुनावले आहे. या वादात अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांनी देखील उडी घेतली आहे.

नरेश अरोरा यांनी अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवल्यावरून अमोल मिटकरी यांनी त्यांना चांगलेच सुनावले आहे. शेवटी तुम्ही पगारावरील शिपाई आहात, असा टोला मिटकरी यांनी लगावला होता. यावर पार्थ पवार यांनी अमोल मिटकरी यांना चांगलेच झापले आहे. तसेच मीडियाल बाईट सुद्धा द्यायचा नाही, असा इशारा देखील देण्यात आला आहे.

पार्थ पवार यांनी एक्सवर लिहिले की, अमोल मिटकरी हे राष्ट्रवादीचे आमदार असूनही पक्षाच्या भूमिकेविरुद्ध भूमिका घेत आहेत, हे दुर्दैवी आहे. नरेश अरोरा आणि डिझाईन बॉक्स संदर्भातील त्यांच्या वक्तव्याचा माझा पक्ष आणि माझे वडिल अजिबात समर्थन करत नाहीत. तसेच, मिटकरी यांनी याबाबत माध्यमांना प्रतिक्रिया देऊ नये, असा इशारा पार्थ पवार यांनी दिला आहे. हे ट्विट त्यांनी इंग्रजी भाषेत लिहिले आहे.



अमोल मिटकरी यांनी एका वृत्तपत्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या यशावर लेख लिहिला आहे. यात त्यांनी काही वादग्रस्त विधाने केली आहेत. तसेच अमोल मिटकरी यांनी नरेश अरोरा यांच्यावर टीका करत थेट तुम्ही पगारी शिपाई असल्याचे त्यात म्हंटले आहे. तसेच वर्तमानपत्रातील लेखात यशाचे डिझाईन राष्ट्रवादीचेच असा टोला त्यांनी लगावला आहे.

अजित पवारांच्या मिडिया कॅम्पेनिंगमध्ये नरेश अरोरा यांच्या डिझाईन बॉक्स कंपनीनेही पीआर एजन्सी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. अजित पवारांचे गुलाबी कॅम्पेन त्यांच्याच माध्यमातून करण्यात आले होते. त्यामुळे, आता विजयानंतर श्रेयवादाची लढाई पाहायला मिळत आहे. मात्र, या सगळ्यावर पार्थ पवारांनीच प्रतिक्रिया दिली असल्याने हा वाद मिटण्याची शक्यता आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत अजित पवारांनी लाडकी बहीण योजनेचा जोरदार प्रचार केला होता. तसेच त्यांचे कॅम्पेन देखील महाराष्ट्रात चांगलेच चालले असल्याचे दिसून आले आहे. या निवडणुकीत लाडकी बहीण योजनेचा अजित पवारांच्या पक्षाला चांगलाच फायदा झाला आहे. विधानसभा निवडणुकीत ५५ पैकी ४१ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला यश आले आहे.

महाराष्ट्रात आता महायुतीचे सरकार स्थापन करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या नेत्याला मुख्यमंत्री पदासाठी पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. तसेच महायुतीची उद्या दिल्ली येथे महत्त्वाची बैठक होणार असून, या बैठकीनंतर अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

# अमरावती विभागातील शासकीय रुग्णालयात अन्नधान्य घोटाळा ! आठ वर्षांपूर्वीची तक्रार

## रुग्णालयांना मागविला पुरवठ्याचा तपशील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शासकीय रुग्णालयात अन्नधान्य पुरवठ्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार आठ वर्षांपूर्वी झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी २२ नोव्हेंबरला अकोला मंडळात येणाऱ्या अमरावती, बुलढाणा, वाशिम, अकोला व यवतमाळ जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयांना आरोग्य सेवा आयुक्त कार्यालयाने अन्नधान्य पुरवठ्याचा तपशील, तसेच रुग्णालयांची नावे पत्ता तेथील संबंधित अधिकाऱ्यांची माहिती मागविण्यात आली आहे.



सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या रुग्णालयांमध्ये अन्नधान्य पुरवठ्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार २० फेब्रुवारी २०१६ रोजी तत्कालीन आमदार स्व. सरदार तारासिंह यांनी केली होती. यामध्ये पुरवठादारांनी कक्ष अधिकारी ते प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याशी संगनमत करून कोट्यवधीचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या तक्रारीनंतर संबंधित गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण होईपर्यंत पुरवठादारांची थकीत बिलेदेखील थांबविण्यात आली होती. या प्रकरणातील पुढील चौकशीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभाग मुंबई अप्पर पोलिस आयुक्त कार्यालयाच्या वतीने सार्वजनिक आरोग्य विभागाला १९ नोव्हेंबर २०२४ रोजी माहिती मागविण्यात आली आहे. त्यामुळे आरोग्य सेवा आयुक्तालयाने अकोला मंडळातील पाचही जिल्ह्यांतील जिल्हा शल्यचिकित्सक यांना २२ नोव्हेंबरला अन्नधान्य गैरव्यवहाराच्या अनुषंगाने सर्व रुग्णालयांचा तपशील मागविला आहे.

**गीताई महिला बचत गटाकडून झाला होता पुरवठा**

अकोला मंडळांतर्गत अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा व यवतमाळ या पाचही जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांना चांदूर बाजार येथील गीताई महिला बचत गट औद्योगिक सहकारी संस्थेकडून अन्नधान्य, तसेच इतर वस्तू पुरवठा करण्यात आला आहे. या संस्थेकडून पुरवठा झालेल्या सर्वच रुग्णालयांचा तपशील मागविण्यात आला आहे.

२०१६ या वर्षामध्ये झालेल्या अन्नधान्य पुरवठ्यातील गैरव्यवहाराच्या अनुषंगाने रुग्णालयांचा तपशील मागविण्यात आला आहे. हा तपशील गोळा करणे सुरू आहे. यासंदर्भातील माहिती सर्व रुग्णालयांना मागविली आहे. हा तपशील प्राप्त होताच पाठविण्यात येईल.

**डॉ. दिलीप सौंदळे,**
**जिल्हा शल्यचिकित्सक**

# शेवग्याच्या शेंगा ४०० पार, लसणाची फोडणी ५०० रुपयांवर, अचानक का वाढले भाज्यांचे दर?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

राज्यात थंडीचा तडाखा दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे भाज्यांच्या किंमतीदेखील वाढत आहे. थंडी वाढत असल्याने भाज्यांच्या उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला फटका बसत आहे. शेवगा आणि लसूणच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत.



ऐन थंडीत लसणाच्या किंमतीत वाढ जाली आहे. किरकोळ बाजारात लसूण ५०० रुपये किलोला विकल्या जात आहेत. त्याचसोबत कांद्याच्यादेखील किंमती वाढल्या आहेत.कांद्याच्या किंमती १०० ते ११० दरम्यान आहेत.

**भाज्यांच्या किंमती**

सध्या बजारात शेवगा ४०० रुपये किलोवर विकले जात आहे. वांगी ६० रुपये किलोंवर विकले जात आहे. अदरक १०० रुपये किलोवर विकले जात आहेत. लिंबू ११५ रुपये किलोवर विकले जात आहेत. दूधीची किंमत ५१ रुपये आहे. भाज्यांच्या किंमती वाढल्याने गृहिणींना आता भाजी घ्यायची की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे.

धाराशिवच्या भुम तालुक्यात ढगाळ वातावरण व हवेतील बदलामुळे ऐन बहरातील तुरीला मोठा फटका बसु लागला आहे त्यात धुक्याचेही प्रमाण वाढले आहे यामुळे तुरीवर अळ्यांचा प्रादुर्भाव होणे सुरू झाले आहे.यंदा तालुक्यात जुन महीन्यापासुन चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी तुरीची पेरणी मोठ्या प्रमाणात केली आहे. मागील दोन तीन वर्षात पुरेशा पावसाअभावी खरीप व रब्बी पिकांना मोठा फटका बसला होता.वातावरणाचा परिणाम तुर पिकावर होत असल्याचे प्रमाण वाढले आहे यामुळे शेतकर्यांनी तुरीवर अळीच्या नियत्रंणासाठी निंबोळी अर्क, प्रोफेनफॉस, इमामेथिन, बेनझॉइडची फवारणी करावी व फवारते वेळी तोंडाला मास्क लावुन आरोग्याची काळजी अस आवाहन कृषी विभागाने केलय.

# विराट १०८ कुंडीय स्वास्थ्य संवर्धन गायत्री महायज्ञ


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८धारणी**

गायत्री परिवार परतवाडा व गायत्री शक्तीपीठ गौरखेडा कुंभी यांच्या माध्यमातून १ ते ४ डिसेंबर दरम्यान धारणी मार्गावरील बुरडघाट राजमहल रिसोर्ट येथील विशाल प्रांगणात विराट १०८ कुंडीय स्वास्थ संवर्धन गायत्री महायज्ञ आयोजित करण्यात आले आहे. या महायंज्ञात सहभागी होण्यासाठी गायत्री परिवारातील महिला अनुयायी रोज शहर व ग्रामीण भागातील प्रत्येकाच्या घरी जाऊन या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करत आहे. नारी सशक्तीकरण व शक्तीसंवर्धन गायत्री महायज्ञ १ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा. वाघामाता देवस्थान येथून कलश यात्रेच्या माध्यमातून प्रारंभ होणार आहे. सायंकाळी ६ वाजता युग शक्ती गायत्री ही संगीतमय प्रवचन तर २ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता ध्यान साधना व प्रज्ञा योग तर स. ८ वाजता चिन्मय पंड्या यांचे यज्ञाचे ज्ञान व विज्ञान यावर उद्बोधन तर संगठनात्मक स्वरुपात दुपारी चर्चा, सायंकाळी ६ वाजता महिलांनी जागृत होत स्वत:ला ओळखा यावर मार्गदर्शन, अशा विविध कार्यक्रमांतर्गत गोरक्षण, गोपालन, यावर मार्गदर्शन तर कार्यक्रमाचा समारोप तर ४ डिसेंबरला होईल.

# मोझरी ग्रामपंचायतीमध्ये आईच्या नावाने पाट्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८तिवसा**

शासकीय कार्यालयात प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याने नेमप्लेट लावताना वडिलांप्रमाणे आईचे नावही अधोरेखित करावे, याबाबत राज्य शासनाने निर्णय घेऊन शासकीय कर्मचाऱ्यांना तसे करणे बंधनकारक केले होते. परंतु, या शासकीय निर्णयाला नोकरदारांनी फार गांभीर्याने घेतल्याचे दिसून आले नाही. तथापि, मोझरी ग्रामपंचायत त्याला अपवाद ठरली आहे.



सध्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या कार्यकाळात मंत्रालयातील आपल्या दालनासमोर आईचे नाव समाविष्ट असलेली पाटी लावून या निर्णयाचा श्रीगणेशा केला होता. तिवसा तालुक्यातील मोझरी ग्रामपंचायतीमध्ये काही दिवसांपासून सरपंच, उपसरपंच,ग्रामविकास अधिकारी तथा कर्मचाऱ्यांच्या नेमप्लेटवर आईचे नाव समाविष्ट करण्यात आले.

कोणत्याही दस्तऐवजावर व्यक्तीच्या नावापुढे वडिलांचेच नाव लावण्यात येते. आईच्या नावाचा कुठेही उल्लेख दिसून येत नाही. तेव्हा आईच्या नावालाही सन्मान मिळावा म्हणून नेमप्लेटवर आईचे नाव समाविष्ट करण्यात यावे, याकरिता शासनाने हा स्तुत्य निर्णय घेतला आहे. तिवसा येथे नायब तहसीलदार आशिष नागरे हे आईच्या नावाने नेमप्लेट लावणारे एकमेव अधिकारी ठरल्यानंतर आता मोझरी ग्रामपंचायतीचे सरपंच सुरेंद्र भिवगडे व सचिव सुरेश झोलेकर यांच्या पुढाकारातून ग्रामपंचायतीमध्ये शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या होणार वेळापत्रकानुसार

## वर्षभर चालणारा घोळ थांबणार: पोर्टलची जबाबदारी खासगी कंपनीकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या बदल्या आता एकाच वेळापत्रकानुसार म्हणजेच दि. ३१ मेपर्यंत पूर्ण केल्या जाणार आहेत. बदल्यांचे वेळापत्रकही शासनाने जारी केले आहे. त्यामुळे वर्षभर चालणारा घोळ आता एकाच वेळापत्रकानुसार थांबणार आहे. शिक्षक बदल्यांची प्रक्रिया ऑनलाइन पोर्टलद्वारे केली जाते. न्यायालयाने एका याचिकेवर सुनावणी करताना बदल्या ऑनलाइन पोर्टलद्वारे राज्यभरासाठी एकाच वेळापत्रकानुसार कार्यान्वित करावे, असे आदेश दिले आहेत. त्यानुसार आता अमरावतीसह सर्व जिल्ह्यात याची अंमलबजावणी केली जाणार आहे.




सर्वसाधारण संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण होऊन शिक्षकांची संख्या निश्चित केली जाईल. त्यानंतर जिल्हा परिषदेत बदलीप्रक्रियेसाठी आवश्यक माहितीची पूर्वतयारी केली जाईल. अवघड क्षेत्र निश्चित केले जाणार आहे. त्यानंतर दरवर्षीच्या वेळापत्रकानुसार बदली प्रक्रिया राबविली जाईल. वेळापत्रक सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर राहणार आहे. पोर्टल सुरळीत सुरू ठेवण्याची जबाबदारी पुणे येथील माहिती तंत्रज्ञान कंपनीवर सोपविण्यात आली आहे. काही अपहार्य कारणास्तव बदलीप्रक्रिया राबविणे शक्य नसल्यास व तसे शासनाने .कळविल्यास त्या वर्षासाठी हे वेळापत्रक लागू राहणार नाही. शिक्षकांच्या बदलीचे वेळापत्रक असे १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी बदलीपात्र शिक्षकांच्या याद्यांची प्रसिद्धी १ ते ३१ मार्च उपलब्ध रिक्त जागांची निश्चितील, १ ते २० एप्रिल बदलीसाठी आवश्यक माहिती जिल्हा परिषदेने कंपनीला देणे, २१ ते २७ एप्रिल समाणीकरणांतर्गत रिक्त पदे निश्चित करणे, २८ एप्रिल ते ३ मे विशेष संवर्ग शिक्षक भाग १ मधील जागा रिक्त जागा घोषित करणे, ४ ते ९ मे विशेष संवर्ग भाग २ मधील रिक्त जागा घोषित करणे, १० ते १५ मे बदली अधिकार प्राप्त शिक्षकांसाठी रिक्त जागा घोषित करणे, १६ ते २१ मे बदलीपात्र शिक्षकांसाठी रिक्त जागा घोषित करणे, २२ ते २७ मे विस्थापित शिक्षकांच्या रिक्त जागा जाहीर करणे आणि २८ ते ३१ मे अवघड क्षेत्रातील रिक्त जागा करणे याप्रमाणे बदलीप्रक्रिया राबविली जाईल.

# आता प्रत्येक शाळेत सिक रूम बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मोर्शी**

आजारी विद्यार्थ्यांना तातडीची वैद्यकीय व्यवस्था करण्यासाठी लागणाऱ्या सोयी-सुविधा उपलब्ध कराव्यात, तसेच शाळांत संबंधित प्राधिकरणांच्या मानकांनुसार आजारी विद्यार्थ्यांना तातडीची वैद्यकीय व्यवस्था करण्यासाठी फर्स्ट एड किंवा सिक रूम उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांना दिले आहेत.



राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शाळांमध्ये दररोज किमान सहा तास विद्यार्थी उपस्थित असतात. या कालावधीत काही विद्यार्थ्यांना तातडीच्या वैद्यकीय उपचारांची गरज भासू शकते. अशावेळी शाळेच्या नजीक वैद्यकीय सुविधा असेलच असे नाही. तातडीचे प्रथमोपचार देण्याबाबत शिक्षकांना शिबिरामध्ये कृत्रिम श्वासोच्छवास प्रशिक्षण देण्यात यावे. शाळेनजीक व उपलब्ध असलेल्या रुग्णालये, आरोग्य केंद्र, खासगी दवाखाने आणि शासकीय व सार्वजनिक रुग्णवाहिकांचे संपर्कक्रमांक ठळक अक्षरात दर्शनी भागात लावावेत, त्यांच्याशी समन्वय ठेवावा. आपत्कालीन हाताळण्यासाठी परिस्थिती शाळेत आवश्यकतेनुसार समन्वयक नेमण्यात यावेत.आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेण्याची गरज भासल्यास शाळेकडे वाहनाची व्यवस्था असावी. विद्यार्थ्यांकरिता शाळास्तरावर तणावमुक्तीसाठी कार्यशाळा आणि इतर उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी समुपदेशकाची व्यवस्था करावी, अशाही सूचना शाळांना दिल्या आहेत. अनेक शाळांमध्ये वेळेवर प्रथमोपचार कीटसुद्धा नसते. अशावेळी या निर्देशांचे कुठवर पालन होते ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# महिला महाविद्यालयात संविधान दिन निमित्त निबंध स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळाद्वारा संचालित महिला महाविद्यालय, अमरावती येथे कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. संविधान दिनाच्या कार्यक्रमानिमित्त 'भारताचे संविधान' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेला कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींचा चांगला प्रतिसाद लाभला. निबंध स्पर्धेला सुरुवात करण्याआधी सर्वविद्यार्थिनीं व शिक्षकांद्वारे उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.या कार्यक्रमाला कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. ममता पांडे सहसचिव नूविशिम ,अमरावती पर्यवेक्षिका, प्रा.माधुरी सोनपरोते, प्रा. मंजिरी वडसे,वरिष्ठ महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रवीण गुल्हाने, प्रमुख अतिथी प्रा.डॉ.अंकुश गिरी संगीत विभाग महिला महाविद्यालय अमरावती तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. संविधान दिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेकरिता कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शाखेच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष मा.डॉ. माया शिराळकर ,सचिव मा.प्रा.निनाद सोमन व सर्व कार्यकारिणीने शुभेच्छा प्रदान केल्या.महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. अविनाश मोहरील यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला.





# विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२४ लेखी परीक्षेच्या पर्यायी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**


संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२४ लेखी परीक्षेच्या पर्यायी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून क्रीडा/सांस्कृतिक/अविष्कार/आव्हान/उत्कर्ष इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या व विद्यापीठाच्या संबंधित अधिका-यांनी प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांच्या विद्यापीठीय पर्यायी परीक्षा दि. २२ जुलै, २०२४ पासून अमरावती, खामगांव, यवतमाळ व वाशिम या परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहेत. अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती (केंद्र क्र. १२५), बुलडाणा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा जी.एस. महाविद्यालय, खामगांव (केंद्र क्र. ३०१), यवतमाळ जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ (केंद्र क्र.४१२), वाशिम जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा आर.ए. महाविद्यालय, वाशिम (केंद्र क्र.७०१), तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा त्यांच्या प्रवेशपत्रावरील केंद्रानुसार त्याच परीक्षा केंद्रांवर घेण्यात येईल.

विद्यार्थ्यांना देण्यात आलेले परीक्षा क्रमांक व प्रवेशपत्र पर्यायी परीक्षेकरीता कायम राहतील. तसेच वेळापत्रक व परीक्षा केंद्रानिहाय रोललिस्ट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. यासंदर्भात प्राचार्य, केंद्राधिकारी, सर्वसंबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून विद्यार्थ्यांना याची जाणीव करुन द्यावी, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी कळविले आहे.

# विधानसभेच्या आटोपल्या; स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका केव्हा होणार?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८ अमरावती**

विधानसभेच्या निवडणुका आटोपल्या आहेत. आता जिल्ह्यातील आजी-माजी पदाधिकाऱ्यांचे लक्ष स्थानिक स्वराज्य निवडणुकांकडे लागले आहे. सरकार सत्तेत आरूढ होताच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी घोषित करणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. अमरावती जिल्ह्यातील नगर पालिका व महानगर पालिकेवर प्रशासक राज आहे. अन्य पालिकांबाबतही असेच चित्र आहे.



विधानसभेची निवडणूक पार पडली असून, सत्ताधारी 'महायुती'ला मोठे यश मिळाले आहे. त्यामुळे माजी नगरसेवक व निवडणुकीची तयारी करणाऱ्या इच्छुकांना या निवडणुकीचे वेध लागले आहेत.महाविकास आघाडी आणि त्यानंतर महायुती सरकारने कार्यकाळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या. सध्याच्या परिस्थितीत २५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत.

परिणामी, स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. या रखडलेल्या निवडणुका तातडीने घेण्याबाबत दबाव वाढत असल्याने या निवडणुका घेण्याच्या हालचाली केव्हा सुरू होणार याकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या -आहेत.महायुतीला घवघवीत यश मिळाल्याने या निवडणुका तातडीने घेतल्या जातील, अशी अपेक्षाही कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. महानगरपालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपून जवळपास ३३ महिने उलटले आहेत, त्यामुळे पालिकेवर दीर्घ काळापासून प्रशासकीय कारभार सुरू आहे.त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचापालिकेतील थेट सहभाग संपुष्टात आला आहे. मात्र, नगरसेवकच नसतील तर आमची कामे कशी होणार, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. त्यांची कामे होत नसल्याने नागरिक चिंतित असून, त्यांना आता नगरसेवकांची उणीव भासू लागल्याचे महापालिका व नगरपालिका क्षेत्रात चित्र आहे.

**हवसे-नवसे गुडघ्याला बाशिंग बांधून**

जिल्ह्यातील नगरपालिका,महानगर पालिका मध्ये प्रशासक राज आहे. यात सर्वाधिक चर्चेची निवडणूक ही अमरावती महानगरपालिकेची ठरणार आहे. राज्यात महायुतीचे सरकार आल्याने अशा स्थितीत निवडणुकीच्या रणसंग्रामात उडी घेणाऱ्या हवसे- नवस्यांचीही कमी नाही. हे येणाऱ्या निवडणुकीत दिसणार आहे.

# तंटामुक्त गाव, ग्रामस्वच्छता मोहीम राहिली नावालाच

## जिल्ह्यात पाठ्यांपुरतीच समिती: गावातील तंटे थेट पोलिस ठाण्यात

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

केंद्र सरकार व राज्य शासनाकडून गावाच्या विकासासाठी अनेक उपक्रम अभियान राबवण्यात आलेली आहेत. काही अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला तर काही अभियान कागदोपत्रीच पार पडले जातात. स्वच्छतेकडून समृद्धीकडे जाण्यासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता व महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान सुरू करण्यात आले होते; मात्र जिल्ह्यामध्ये सध्या या मोहिमेला हरताळ फासल्याचे दिसून येत आहे. गावपातळीवरचे तंटे थेट पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचत आहेत. गावातील किरकोळ वाद-तंटे गावातच सामोपचाराने मिटवण्याच्या उद्देशाने तत्कालीन गृहमंत्री दिवंगत आर. आर. पाटील यांनी राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियानाची सुरुवात केली होती. या अभियानामुळे गावागावातील तंटे कमी झाले होते. तर गावांमध्ये नेमलेल्या समित्याही जोमाने काम करीत होत्या; मात्र शासनाने या समित्यांकडे दुर्लक्ष केले असल्याने



जिल्ह्यात तंटामुक्ती समित्या फक्त पाट्या लावण्यापुरत्याच उरल्या आहेत. जिल्ह्यातील ग्रामीण भाग हा विकासाच्या वाटेवर आहे. भाव भावकीत उद्भवणारे तंटे सोडविण्यासाठी तंटामुक्ती समिती नेमण्यावर भर दिला जात होता. गावातील छोटे-मोठे तंटे पोलिस ठाण्यात जाण्याअगोदरच मिटावेत. तसेच गावपातळीवर एकोपा निर्माण होऊन जातीय सलोखा कायम ठेवणेहा या अभियानाचा मुख्य उद्देश होता.

ग्रामपातळीवरील तंटामुक्त समित्या गठित करून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सदस्यांची निवड केली होती. त्यानंतर या मोहिमेला गावागावातून चांगला प्रतिसाद मिळाला होता. तसेच गावातील तंटे गावातच मिटू लागल्याने पोलिसांवरचा ताण कमी होऊन जातीय सलोखा राखला जाऊ लागला होता; मात्र सध्या या अभियानाकडे शासनाने पाठ - फिरवल्याने केवळ समित्या नावालाच उरल्या असून सरकारी अनास्थेमुळे समित्यांचे अस्तित्व शिल्लक राहिलेले नसल्याचे दिसत आहे.

गावागावात शांतता व सलोखा टिकून राहावा, गावातील तंटा गावातच मिटवावा यासाठी महात्मा गांधी तंटामुक्त अभियान राबवले जात होते; मात्र सद्य:स्थितीत या दोन्ही अभियानाला घरघर लागल्याचे स्पष्ट दिसत आहे. स्वच्छता व तंटामुक्त हे दोन्ही उपक्रम सामाजिक जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे अभियान आहेत.दोन्ही अभियान एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने गावात शांतता, एकोपा दिसत होता, पण परिस्थितीबिघडलेली आहे. त्यामुळे ते योग्य राबविणे, शांततामय वातावरण निर्मिती करण्यासाठी व सुंदरगावाची संकल्पना करण्यासाठी हे दोन्ही समाजोपयोगी अभियान राबवले पाहिजेत.

**गावागावात समिती कागदोपत्रीच**

तंटामुक्त गाव अभियान समिती गावागावात स्थापन करण्यात आली, परंतु तंटामुक्त समितीच्या सभेला फक्त २-३ सदस्य उपस्थित असतात, तर अनेक गावात केवळ कागदोपत्रीच तंटामुक्ती समिती आहे.

**तक्रार निवारण अभावी परिस्थिती गंभीर**


महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेंतर्गत गावात समितीची स्थापना केली जात होती. समितीच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम, लहान-मोठे तंटे, एकमेकांत झालेला वाद, शेतीचा वाद गावपातळीवरील समितीच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न केला जात होता. गावातील तक्रारीचे निवारण गावातच होत असल्यामुळे तंटे पोलिस ठाण्यापर्यंत कधीही जात नव्हते; पण आता रोज गावातील भांडण पोलिस ठाण्यात येत आहे.

**नव्या समित्या निर्माण करण्याची गरज**

गाव जर खरंच तंटामुक्त व्हावे, अशी प्रशासन व राज्यकर्त्यांची भूमिका असेल, तर पुन्हा गावागावांत तंटामुक्त ग्राम समितीचे नवे स्वरूप निर्माण करणे आवश्यक आहे. पोलिस प्रशासन, स्थानिक प्राधिकरण यांचा मेळ घालून प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, तलाठी, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी, वनाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आदींच्या सहभागाची गरज आहे.

# अहमदाबाद - पुरी एक्सप्रेस थांबविण्यासाठी रेल्वे ट्रॅकमन ४०० मिटर लाल कापड घेऊन धावला

## अन... मोठा अनर्थ टळला : धामणगांव रेल्वे स्थानकानजिक रेल्वे ट्रॅकचे होते वेल्डींग उखडलेले





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८ धामणगाव रेल्वे**

येथील रेल्वे स्थानकच्या पुढे डाऊन बाजूला असलेल्या पोल क्र. ७०९-० ते ७१२-० दरम्यान रेल्वे ट्रॅक मधील वेल्डींग उखडल्याचे ट्रॅकमन च्या लक्षात आले. दरम्यान अहमदाबाद पुरी एक्सप्रेस सुसाट येत असल्याचे दिसल्याने ट्रॅकमनने लगेच लाल कापड घेत समोरुन येणाऱ्या रेल्वेच्या दिशेने धाव घेत ४०० मिटर पुर्वीच एक्सप्रेस थांबविली . ट्रॅकमन च्या सतर्कतेने मोठा अपघात टळला. असुन त्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. तर दुसरीकडे या दरम्यान अहमदाबाद पुरी एक्सप्रेस १५ ते २० मिनीटे रखडली.तर त्यामागे मुंबई हावडा मेल सुध्दा रेल्वे स्थानकावर उभी करण्यात आली होती.गेल्या काही वर्षापुर्वी सदर घटनास्थळा जवळच हावडा अहमदाबाद एक्सप्रेचा अपघात होऊन १७ जण मृत्यूमूखी पडले होते. मिळालेल्या माहिती नुसार धामणगांव रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या गौरक्षण कडील संतोष माता मंदीराजवळ पोल क्र. पोल क्र. ७०९-० ते ७१२-० दरम्यान डाऊन लाईन मधील किमी ७१० च्या २६२८ मध्ये रेल्वे रुळावरील वेल्डींग उखडल्याने १ इंची भेग निर्माण झाली होती सकाली तपासणी करणाऱ्या ट्रॅकमॅन भोलराम मिना यांच्या सदरचा प्रकार लक्षात आला सदरची बाब वरीष्ठांच्या कानी घालतांनाच समोरुन पुरी अहमदाबाद एक्सप्रेस येत असल्याचे दिसताच भोलाराम मिना याने लाल बाल बावटा रेल्वेच्या दिशेने धावणे सुरु केले घटनास्थळाच्या ४०० मिटर पुर्वीच अहमदाबाद पुरी एक्सप्रेस थांबल्याने पुढील अनर्थ टळला ट्रॅकमन भोलालाल मिना यांचच्या सतर्कतेचे सर्वत्र कौतुक होत असुन मोठा अनर्थ टळल्याने सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. दरम्यान लेगच रेल्वे प्रशासनाने सदर रेल्वे ट्रॅक दुरुस्त करण्याचे कार्य सुरु केले. रेल्वे अधिकाऱ्यांनुसार सदरची बाब ही दैनंदिन असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**२३ वर्षापुर्वी हावहा अहमाबाद एक्सप्रेसला घडला हेता मोठा अपघात**

१७ जण मृत्यूमूखीसदर घटनास्थळाच्या १ किमी अंतरावरच २० वर्षापुर्वी मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास हावडा -अहमदाबाद एक्सप्रेसला अपघात होऊन मोठी दुर्घटना घडली होती.सदर घटनेत जवळपास १७ लोक मृत्यूमूखी पडले होते तर ५० हून अधिक लोक जखमी झाले होते. त्या घटनेची आठवण या निमीत्ताने स्थानिकांना झाली.

# मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस विराजमान होतील

## नवनीत राणांचं वक्तव्य : बच्चू कडू वर हि केला शाब्दिक 'प्रहार'





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला स्पष्ट जनादेश मिळाला आहे. त्यानंतरही अजून मुख्यमंत्रीपदाचं नाव जाहीर झालेलं नाही. मुख्यमंत्रीपदासाठी यंदा देवेंद्र फडणवीस यांचं नाव सर्वात आघाडीवर आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही याबाबत भाजपा श्रेष्ठींचा निर्णय मान्य असल्याची घोषणा केलीय. या सर्व घडामोडींमध्ये भाजपा नेत्या नवनीत राणा यांची त्यांच्या मनातील मुख्यमंत्री सांगितला आहे.

'हा निकाल आम्हाला अपेक्षित होता. मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस विराजमान होतील, असं राणा यांनी स्पष्ट केलं. आम्ही देवेंद्र फडणवीस यांचे सैनिक आहोत. त्यांनी गेल्या त्याग केला, यावेळी तसं होणार नाही. महाराष्ट्राच्या जनतेचा विचार आम्ही घेऊन जात आहोत. देवेंद्र फ़डणवीस मुख्यमंत्री व्हावे, हे आमचं लक्ष आहे असं राणा यांनी स्पष्ट केलं.

**बच्चू कडूंना टोला**

अमरावती जिल्ह्यातील बच्चू कडू आणि राणा दाम्पत्य यांच्यातील राजकीय वाद गेल्या काही महिन्यांपासून सातत्यानं गाजतोय. लोकसभा निवडणुकीत अमरावतीमधून नवनीत राणा पराभूत झाल्या होत्या. त्यांच्या पराभवात बच्चू कडू यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. महायुतीचा भाग असूनही कडू यांनी भाजपा उमेदवार राणांच्या विरोधात उघड भूमिका घेतली होती. विधानसभा निवडणुकीतही हा संघर्ष कायम होता. पण, यंदाच्या लढाईत राणा दाम्पत्यांची सरशी झाली. बडनेरा मतदारसंघातून रवी राणा विजयी झाले. तर, अचलपूरमधून बच्चू कडू यांना पराभव स्विकारावा लागला. बच्चू कडू यांच्या पराभवावर नवनीत राणा यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

माझ्या जनतेने बदला घेतला आहे. जनतेनं जागा दाखवून दिलीय. दादा आता कसं वाटतंय, गार गार वाटतंय ना,' असा टोला राणा यांनी बच्चू कडू यांना लगावला. जनता जनार्दनाची औकात काढणाऱ्यांना जनतेनं औकात दाखवली आहे. ते आपल्या मतदारसंघातही दिवे लावू शकले नाहीत, अशी टीका राणा यांनी केली. बच्चू कडू यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीपासून वेगळं होतं, स्वतंत्र आघाडीची स्थापना केली होती. त्यांचा अचलपूर मतदारसंघात भाजपाच्या प्रवीण तायडे यांनी १२ हजार १३१ मतांनी पराभव केला. तर नवनीत राणाचे पती रवी राणा बडनेरा मतदारसंघातून ६६ हजार ९७४ मतांनी विजयी झाले.

# दुबई येथे होणाऱ्या पहिल्या विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटक डॉ. मोना चिमोटे यांचा विद्यापीठाच्यावतीने कुलगुरूंनी केला सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

छत्रपती संभाजीनगर येथील मुक्त सृजन संस्था, मुक्त सृजन साहित्य पत्रिका व संस्कृती प्रकाशन, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ५ ते १० डिसेंबर, २०२४ दरम्यान दुबई येथे होणा-या पहिल्या विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटकपदी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख तथा मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी डॉ. मोना चिमोटे यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यापीठाच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आदी उपस्थित होते.

साहित्य समीक्षक, संशोधक आणि लेखिका म्हणून डॉ. मोना चिमोटे यांची ओळख आहे. 'रहस्यकथा या कथाप्रकाराचा चिकित्सक अभ्यास' या विषयावरील शोधप्रबंधासाठी डॉ. चिमोटे



यांना अमरावती विद्यापीठाने आचार्य पदवी प्रदान केली आहे. 'मराठी विज्ञान कथात्म साहित्याचा समाजावर होणारा परिणाम' या विषयावर त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रकल्प पूर्ण केला असून त्यांना पोस्ट डॉक्टरल रिसर्च अवॉर्ड प्राप्त झाला आहे. याशिवाय 'अनुवादीत विज्ञान कथात्म साहित्याचा मराठी विज्ञान कथात्म साहित्यावर झालेला प्रभाव' या विषयावर त्यांनी विद्यीपीठ अनुदान आयोगाचा मेजर रिसर्च प्रोजेक्ट ही पूर्ण केला आहे. कवी अज्ञात यांची स्वच्छंद, अनुकंपा, डोहवळ, स्नेहदग्ध, ओघळांचे नकाशे, अनन्यशर आणि 'अज्ञातवास : एक काव्यखंड' इत्यादी काव्यसंग्रहांचे संपादन त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या 'पळसबंध' या ललित लेखनसंग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त असून हा संग्रह बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या बी. ए. भाग दोनच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या 'कालखंडानुसार साहित्याभ्यास' या पुस्तकाचा समावेश यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात झाला आहे. डॉ. मोना चिमोटे यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.